आवृत्ती – अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

दैनिक राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक १३३ । मंगळवार २४ फेब्रुवारी २०२६

। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 । www.rashtrasahyadri.com



वरळी : महाराष्ट्राच्या राजकारणातील एक कणखर नेतृत्व, माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांना वरळी येथे आयोजित शोकसभेत राज्यभरातील मान्यवरांनी विनम्र श्रद्धांजली वाहिली. याप्रसंगी राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, मंत्री पंकजा मुंडे आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

# निवडणुका घेण्यास 'सर्वोच्च' मनाई

## आरक्षण मर्यादेचा भंग : २२ जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या निवडणुका लांबणीवर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** राज्यातील ५० टक्के आरक्षण मर्यादा ओलंडलेल्या स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुका घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने मनाई केली आहे. राज्यात आता २२ जिल्हा परिषदा आणि त्यांअतर्गत येणाऱ्या पंचायत समित्यांच्या निवडणुका प्रलंबित राहणार आहेत. महाराष्ट्राच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील ओबीसी आरक्षणावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रलंबित निवडणूक घेण्यास परवानगी देण्याची मागणी राज्य सरकारकडून करण्यात आली होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने उर्वरित जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका घेण्यास मनाई केली आहे.

राहुल रमेश वाघ विरुद्ध केंद्र सरकार, महाराष्ट्र सरकार या मूळ याचिकेवर सुनावणी झाली. बांठिया समितीच्या अगोदर जी स्थिती होती त्यानुसार निवडणूक घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. राज्य निवडणूक आयोगाने आरक्षण निश्चिती करताना ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडली गेली होती. काही ठिकाणी निवडणुका देखील पार पडल्या. २२ जिल्हा परिषद आणि या जिल्ह्यांमधील पंचायत समितीत आरक्षणाची ५० टक्के मर्यादा ओलांडली गेली होती. त्यामुळं या ठिकाणच्या निवडणुका घेण्यास स्थगिती देण्यात आली होती. राज्य निवडणूक आयोगाने १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुका पार पडलेल्या आहेत. उर्वरित २२ जिल्हा परिषदांच्या आणि उरलेल्या पंचायत समित्यांच्या निवडणुका अनिश्चित काळासाठी प्रलंबित राहण्याची शक्यता आहे.

राज्यातील ५० टक्के आरक्षण मर्यादा ओलांडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर सर्वोच्च न्यायालयानं मनाई कायम ठेवली आहे. (पान ४ वर)

### ओबीसींच्या राजकीय आरक्षणावर लवकरच सुनावणी

**ओबीसींच्या महाराष्ट्रातील राजकीय आरक्षणावर लवकरच अंतिम सुनावणीला सुरुवात होणार असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले. अंतिम सुनावणी लवकर घेऊ, अशी भूमिका सर्वोच्च न्यायालयाने घेतली आहे. अंतिम सुनावणीची पूर्वतयारी पूर्ण करण्याचे सर्व वकिलांना निर्देश दिले आहेत.**

# अजितदादा महाराष्ट्राला न लाभलेले सर्वोत्कृष्ट मुख्यमंत्री : फडणवीस

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** वक्तशीरपणा हा अंगभूत गुण असलेले अजित पवार कधीच वेळ चुकवत नसत.ते खूप मोठी इनिंग खेळतील,असे दिसत असताना, अजित पवार यांनी पहिल्यांदाच आयुष्याचे टायमिंग चुकवले. ते सहावेळा उपमुख्यमंत्री झाले,सर्वाधिक वेळा उपमुख्यमंत्री होण्याचा मान त्यांना मिळाला. ते केवळ आमचे स्ट्रॅटेजिक पार्टनर नव्हते, तर अंतःकरणापासून मित्रत्व जपणारे माझे मोठे भाऊ होते, मी कधीतरी मुख्यमंत्री होईन असे ते म्हणायचे. अशी आठवण सांगून,अजित पवार म्हणजे महाराष्ट्राला न लाभलेले सर्वोत्कृष्ट मुख्यमंत्री होते, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत शोकप्रस्ताव मांडला.यावेळी बोलताना फडणवीस म्हणाले की ,अनेकदा ज्येष्ठ नेत्याच्या निधनानंतर पोकळी निर्माण झाली असे म्हणतो. पण अजित पवार यांच्या जाण्याने या शब्दाची खरी व्याख्या कळली. अजित दादांसारखे दुसरे व्यक्तिमत्व होणे आता शक्य नाही. ते केवळ आमचे स्ट्रॅटेजिक पार्टनर नव्हते, तर अंतःकरणापासून मित्रत्व जपणारे माझे मोठे भाऊ होते. आमचा दोघांचाही जन्म २२ जुलैचा, ते माझ्यापेक्षा ११ वर्षांनी मोठे असल्याने खऱ्या अर्थाने माझे दादाच होते अशा शब्दात मुख्यमंत्री फडणवीस यांनी भावना व्यक्त केल्या.

पहाटेच्या बहुचर्चित शपथविधीच्या आठवणी सांगताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, २०१९ मध्ये सरकार स्थापनेचा निर्णय त्यांच्या वरिष्ठांनी बदलला,पण अजितदादांनी शब्द दिला होता आणि तो त्यांनी पाळला. त्याला लोक पहाटेचा शपथविधी म्हणतात, पण दादांना ते आवडत नसे; कारण तो सकाळी आठ वाजता झाला होता.त्यांनी शब्दासाठी मोठी राजकीय किंमत मोजली.पुढे सर्वोच्च न्यायालयाचा निकाल विरोधात गेल्यावरही आम्ही वर्षावर सोबत होतो. तेव्हा मीच त्यांना सांगितले की, तुमच्या सोबतच्या सहकाऱ्यांचे भविष्य पाहता तुम्ही तुमचा निर्णय घ्यायला मोकळे आहात, अशी आठवणही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितली.

२०१९ मध्ये मी विरोधीपक्ष नेता असताना, अजित पवार सत्ताधारी बाकांवरून बोलताना माझा उल्लेख मुख्यमंत्री असा करायचे. (पान ४ वर)

**कोणत्याही मुख्यमंत्र्याला अजितदादा हेच अर्थमंत्री असावेत असे वाटत होते. यावर्षी अजितदादांनी त्यांच्या कारकीर्दीतील १२वा अर्थसंकल्प मांडला असता. पुढच्या वर्षी १३ वा अर्थसंकल्प मांडून त्यांनी बॅरिस्टर शेषराव वानखेडे यांच्या विक्रमाशी बरोबरी केली असती. कदाचित त्या नंतरच्या कालावधीत सर्वाधिक वेळा अर्थसंकल्प मांडणारे नेते म्हणून त्यांच्याकडे पाहिले गेले असते. पण त्याआधीच ते गेले.**

## महत्त्वाचे..



### काँग्रेस प्रवक्त्याला हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांकडून मारहाण

**पुणे :** एका वृत्तवाहिनीच्या कार्यालयाबाहेर काँग्रेसचे प्रवक्ते हनुमंत पवार यांच्यावर काही हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांकडून मारहाण करण्यात आल्याची घटना घडली आहे. डिबेट शोसाठी ते संबंधित ठिकाणी गेले असताना तुषार दामगुडे आणि त्यांच्या सोबत असलेल्या इतर काही व्यक्तींनी त्यांना मारहाण केल्याचा आरोप आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी या घटनेचा सीसीटीव्ही फुटेज ट्विट करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

'मी एका वृत्तवाहिनीच्या डेबिट शोला गेलो होतो तिथं मी भाजपच्या नेत्यांनी ज्या पद्धतीने छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान केला होता त्याची आठवण करून दिली आणि याचाच राग या हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांना आला. बाहेर आल्यानंतर मला धमकवण्यात आलं हर्षवर्धन सपकाळ याबद्दल बोललो तर तुला राग का येतो? असं म्हणतं कमरेला बघ पिस्टल आहे, अशा पद्धतीने धमकवण्यात आलं', असं हनुमंत पवार म्हणाले.

# फडणवीस ६ मार्च रोजी सादर करणार अर्थसंकल्प

- अधिवेशनासाठी उपमुख्यमंत्री शिंदे यांच्याकडील खात्यांचा कार्यभार सहकाऱ्यांकडे
- नगर विकास उदयसामंतांकडे; तर सार्वजनिक बांधकामची दादा भुसेंकडे...
- 'गृहनिर्माण'ची जबाबदारी शंभूराज देसाईंना

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान तात्पुरते इतर मंत्र्यांना त्यांचे खाते सोपवले आहे. ही व्यवस्था फक्त अर्थसंकल्पीय अधिवेशन संपेपर्यंतच राहील. त्यांनी या संदर्भात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना पत्र पाठवले आहे. महाराष्ट्र विधानसभेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सोमवारपासून सुरू झाले. या अधिवेशनादरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ६ मार्च रोजी विधानसभेत राज्याचा अर्थसंकल्प सादर करतील.

अजित पवार यांच्या विमान अपघातात निधन झाल्यानंतर विधानसभेचे हे अर्थसंकल्पीय अधिवेशन होत आहे . त्यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांची उपमुख्यमंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे आणि हे त्यांचे विधानसभेतील पहिलेच अधिवेशन असेल. सार्वजनिक बांधकाम विभागाची (पीडब्ल्यूडी) जबाबदारी कॅबिनेट मंत्री दादा भुसे यांच्याकडे देण्यात आली आहे. नगरविकास विभागाचा कार्यभार कॅबिनेट मंत्री उदय सामंत यांच्याकडे सोपवण्यात आला आहे.

गृहनिर्माण विभागाची जबाबदारी कॅबिनेट मंत्री शंभूराज देसाई यांच्याकडे देण्यात आली आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान, विधानसभा आणि विधान परिषदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये एकाच वेळी प्रश्न विचारले जातात. संबंधित विभागांकडून प्रश्नांची उत्तरे सुलभ करण्यासाठी, ही जबाबदारी इतर मंत्र्यांवर सोपवण्यात आली आहे. राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या अभिभाषणाने अधिवेशनाची सुरुवात झाली. पहिल्या दिवशी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचा परिचय आणि दिवंगत नेते अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी विरोधकांकडून गोंधळ होण्याची भीती होती, परंतु शोक प्रस्तावामुळे विरोधकांनी सभागृहाच्या आत किंवा बाहेर कोणताही गोंधळ निर्माण केला नाही. दुसऱ्या दिवशी, मंगळवार, अधिवेशनाचा दुसरा दिवस वादळी राहण्याची अपेक्षा आहे. सोमवारी सभागृहाचा पहिला दिवस अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या चौकशीबाबत आणि सभागृहाबाहेर आमदार आणि मंत्र्यांच्या वक्तव्यांवरून भरला गेला.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांनी अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या सुरू असलेल्या चौकशीवर नाराजी व्यक्त केली.

### अजित पवार यांच्या पक्षाचे आमदार

**अमोल मिटकरी म्हणाले की, विमानाचे मुख्य कॅप्टन कॅप्टन सुमित कपूर यांनी अजित दादांना मारण्याचे कंत्राट घेतले होते. कंत्राट कोणी दिले याची चौकशी झाली पाहिजे. त्याच वेळी, काही नेत्यांनी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाबाबत आपली विधानेही दिली, तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अजितदादांची आठवण काढताना असेही म्हटले की अजितदादा कधीही मुख्यमंत्री होऊ शकत नाहीत पण जर ते झाले असते तर ते सर्वात कार्यक्षम आणि शिस्तबद्ध मुख्यमंत्री असल्याचे सिद्ध झाले असते.**

# कोचिंग क्लास चालकासह एका विद्यार्थ्यालाही बेड्या!

## बारावी पेपरफुटीचे प्रकरण : मोबाईलवर डिजिटल कॉपी पकडल्याने भांडाफोड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नागपूर :** नागपूर शहरात बारावी परीक्षेतील पेपर फुटल्याच्या धक्कादायक प्रकारामुळे शैक्षणिक क्षेत्रात मोठी खळबळ उडाली. बारावीच्या दोन पेपरफुटी प्रकरणाच्या तपासाअंती आता दोघांना अटक करण्यात आली आहे. कोचिंग क्लास चालकासह एका विद्यार्थ्याला या प्रकरणी पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत.





निशिकांत मूल (४५, मानकापूर) असे ट्युशन क्लासेस चालवणाऱ्या संचालकाचे नाव आहे. तर फरहान अख्तर असे अटक करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांचे नाव आहे. सेंट उर्सुला हायस्कूल परीक्षा केंद्रावरील पर्यवेक्षकामुळे हा प्रकार उघड झाला होता. यात रसायनशास्त्राच्या पेपरच्या वेळेपूर्वीच व्हॉट्सॲपवर प्रश्नपत्रिका आल्याचे पुढे आले. दरम्यान, वारंवार प्रसाधनगृहात गेलेल्या विद्यार्थिनीवर संशय आल्याने तिची झडती घेतली असता स्मार्टफोन आढळून आला. त्यानंतर हा मोबाईल जप्त करत तपासणी केली असता मोबाईलमध्ये परीक्षा सुरू होण्यापूर्वीच १०.३७ ला पेपर, प्रश्नांसोबत उत्तरेही एका व्हॉट्सॲप ग्रुपवर आढळून आले. २१ सदस्यांच्या व्हॉट्सॲप ग्रुपवर निशिकांत मूलच्या क्रमांकावरून पेपर पाठवल्याचे उघड झाले. यात बारावीच्या विज्ञान शाखेचे फिजिक्स आणि केमिस्ट्रीचा पेपर परीक्षेच्या तासाभरापूर्वीच व्हाट्सअपवर आल्याची माहिती आहे. गुरुवारी बारावी केमिस्ट्रीचा पेपर होता. मात्र परीक्षेआधी पेपर विद्यार्थ्यांच्या व्हाट्सअप ग्रुपवर आला होता. नागपूर शहरातील सदरच्या सेंट उर्सुला परीक्षा केंद्रावर हा प्रकरण उघडकीस आला आहे.

# तुकाराम मुंडे यांच्याकडे परभणीच्या पालक सचिव पदाची जबाबदारी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव असलेल्या तुकाराम मुंढे यांची पुन्हा जिल्हा प्रशासनात एन्ट्री होणार आहे. मुंढेंची परभणीच्या पालक सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. याशिवाय राज्याचे मुख्य सचिव राजेश अगरवाल यांच्यासह आणखी ५ आयएएस अधिकाऱ्यांचीही वेगवेगळ्या जिल्ह्यांचे पालक सचिव म्हणून नियुक्ती झाली आहे.



जिल्हा स्तरावरील शासकीय कार्यालयांच्या शासन स्तरावरील (मंत्रालय स्तरावरील) प्रलंबित बाबींची तातडीने सोडवणूक करण्याकरिता तसेच शासनाचे धोरणात्मक निर्णय, प्रशासकीय सुधारणा आणि विविध लोकोपयोगी व कल्याणकारी योजना यांची क्षेत्रीय स्तरावर अधिक प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरिता राज्यातील प्रत्येक जिल्ह्यासाठी पालक सचिव यांची नियुक्ती करण्यात येते.

शासनाचे धोरणात्मक निर्णय, प्रशासकीय सुधारणा आणि विविध लोकोपयोगी व कल्याणकारी योजना यांची क्षेत्रीय स्तरावर अधिक प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याची जबाबदारी पालक सचिवांकडे असते. यासाठी त्यांना संबंधित जिल्ह्यात ३ महिन्यातून एकदा किंवा वर्षातून ४ वेळा जिल्ह्यात दौरा करणे आवश्यक असते. शासनाच्या कल्याणकारी योजनांचा आढावा घेणे, त्याचा अहवाल सादर करणे, येत असलेल्या अडचणींवर उपाय सुचवायचे असतात. यानुसार, यापूर्वी एकनाथ शिंदे यांच्या सरकारने महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांसाठी पालक सचिवांची नियुक्ती केली आहे. मात्र प्रशासकीय कारणास्तव यात काही अंशी बदल करण्यात आला आहे. यातच तुकाराम मुंढे यांच्याकडे परभणीची जबाबदारी देण्यात आली आहे. या निमित्ताने मुंढेची अनेक वर्षांनंतर एखाद्या जिल्ह्याच्या प्रशासनात एन्ट्री होत आहे. मुंढे यांनी यापूर्वी सोलापूरचे जिल्हाधिकारी, नाशिक, नागपूर या महापालिकांचे आयुक्त म्हणून जबाबदारी पार पाडली आहे. (पान ४ वर)

# थकबाकीमुळे २५ लाख शेतकऱ्यांसाठी बँकांचे दरवाजे बंद!

### अधिवेशनात कर्जमाफीच्या घोषणेची अपेक्षा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** राज्यातील २५ लाख शेतकऱ्यांकडे सद्य:स्थितीत बँकांचे ३५ हजार ५०० कोटी रुपये थकले आहेत. अडचणीतील शेतकऱ्यांना कर्जमाफी देऊन त्यांच्या डोक्यावरील कर्जाचा भार कमी केला जाणार आहे. कर्जमाफी व दीर्घकालीन उपाययोजनांची घोषणा राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातच होईल, अशी माहिती सहकार विभागातील सूत्रांनी दिली. त्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी थकबाकीदार व नियमित कर्जदार शेतकऱ्यांची (पान ४ वर)

### शेतकऱ्यांकडील थकबाकी

**एकूण शेतकरी**
**१,३३,४४,२०९**
**थकबाकीतील शेतकरी**
**२४,७३,५६६**
**शेतकऱ्यांकडील एकूण थकबाकी**
**३५,४७७ कोटी**

# सौंदाळा गावचा जातमुक्तीचा विचार राज्यभर पोहोचावा पाहिजे : सपकाळ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर– आजसर्वत्र भेदभाव निर्माण करणारे, द्वेषाचे, भिती दाखवण्याचे वातावरण जाणिवपूर्वक निर्माण केले जात आहे. जातीपातीच्या, धर्माच्या भिंती उभ्या करून माणसा–माणसातील प्रेम, जिव्हाळा संपवला जात आहे. सर्वत्र द्वेषाची भावना वाढीस जात असताना अहिल्यानगर जिल्ह्यातील नेवासा तालुक्यातील सौंदाळा या गावाने ग्रामसभेत जातमुक्तीचा ठराव मंजूर करून एक वेगळा आदर्श घालून दिलेला आहे, हा आदर्श राज्यात सर्वदूर पोहचला पाहिजे, असे प्रतिपादन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले आहे.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी अहिल्यानगरच्या नेवासा तालुक्यातील जातमुक्त सौंदाळा गावाला भेट देऊन गावकऱ्यांचे अभिनंदन करत संवाद साधला. यावेळी सौंदळ्याचे सरपंच शरद आरगडे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे वरिष्ठ





उपाध्यक्ष मोहन जोशी, सरचिटणीस प्रभावतीताई घोगरे, अहिल्यानगर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सचिन गुजर, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर मुरकुटे, अभिजीत लुनिया, जिल्हा सरचिटणीस रंजन जाधव, नेवासा तालुकाध्यक्ष नानासाहेब पठारे, महिला जिल्हाध्यक्ष लताताई डांगे, शिर्डीचे शहराध्यक्ष सचिन चौगुले, पाथर्डी तालुकाध्यक्ष नासिर शेख तसेच पदाधिकारी, कार्यकर्ते आणि गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रमस्थांशी संवाद साधताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प जगाला भिती घालत आहेत, युद्धाची धमकी देत आहे. देशात व राज्यातही भेद निर्माण करणारे, भितीचे वातावरण पसरवणारे अनेक प्रवाह आहेत. अशा वातावरणात सौंदाळा गावाने जातमुक्तीचा ठराव करून 'डरो मत' चा संदेश दिला आहे. खरे तर जाता जात नाही ती जात, धर्म बदलता येतो पण जात बदलता येत नाही. मुलाला शाळेत प्रवेश घ्यायचा म्हटले की आधी जात लिहावी लागते. आज जातीपातीच्या भिंती अधिक गडद होऊ लागल्या आहेत. बीड जिल्ह्यात संतोष देशमुख यांची निघृण हत्या झाली व त्यानंतर सामाजिक वातावरण बिघडले. आपल्याच जातीच्या दुकानातून किराणा घ्या, इथपासून किर्तनकारही आपल्याच जातीचा बोलवावा इथपर्यंत हे लोण गेले, अशा परिस्थितीत काँग्रेस पक्षाने पुढाकार घेऊन सद्भावना पदयात्रा काढत समाजातील सर्व जाती धर्माच्या लोकांना बरोबर घेऊन जाण्याचा प्रयत्न केला.

सौंदाळा गावाने एकता, समता आणि बंधुभाव यांचा संदेश देत खूप मोठे पाऊल टाकले असून आज राष्ट्रसंत गाडगे महाराजांची जयंती आहे. गाडगेबाबा हे स्वच्छता, अंधश्रद्धा निर्मूलन, सामाजिक न्याय आणि मानवतेचे प्रबोधन करणारे थोर संत होते. त्यांच्या विचारांशी पूर्णपणे जुळणारा हा निर्णय म्हणावा लागेल. अज्ञान, भेदभाव आणि अस्वच्छतेविरुद्ध लढणाऱ्या गाडगे बाबांच्या मार्गावरच सौंदाळा गाव चालत आहे. गढूळ झालेल्या वातावरणात सौंदाळा गावाने तुरटी फिरवण्याचे काम केले आहे असेही हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

## संपादकीय

### मातृत्वाच्या पावित्र्याला कलंक

महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यातील बदलापूर शहरात अलीकडेच उघडकीस आलेले स्त्रीबीज तस्करीचे रॅकेट हे केवळ एका गुन्हेगारी कृत्याचे उदाहरण नाही, तर आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञान आणि आर्थिक असमानतेच्या मिश्रणातून उद्भवलेल्या एका गंभीर सामाजिक समस्येचे प्रतीक आहे. गरीब आणि असुरक्षित महिलांना आर्थिक प्रलोभन दाखवून त्यांच्या स्त्रीबीजाची अवैधरित्या विक्री करणाऱ्या या रॅकेटने समाजाच्या नैतिकतेच्या मुळावरच घाव घातला आहे. पोलिसांनी तीन महिलांना अटक केली असली तरी हे रॅकेट केवळ या तिघींपुरते मर्यादित नाही; यामागे एक संघटित नेटवर्क आहे, ज्यात आयव्हीएफ केंद्रे, डॉक्टर आणि इतर वैद्यकीय व्यावसायिकांचा सहभाग असण्याची शक्यता आहे. ही घटना समाज, तपास यंत्रणा आणि शासनासाठी एक इशारा आहे की, मातृत्वासारख्या पवित्र भावनेचा बाजार मांडला जात असताना आपण कुठे चुकतो आहोत?

या रॅकेटचे स्वरूप समजून घेण्यासाठी प्रथम घटनेच्या तपशीलाकडे वळू. बदलापूर पूर्वेकडील जोवेली भागातील एका निवासी अपार्टमेंट आणि सोनोग्राफी केंद्रातून हे रॅकेट चालवले जात होते. आरोपी महिलांनी – सुलक्षणा गाडेकर (४४), आश्विनी चाबुकस्वार (२९) आणि मंजुषा वानखेडे (४६) – गरीब महिलांना २५,००० ते ३०,००० रुपयांच्या प्रलोभनाने आकर्षित केले. या महिलांना हार्मोन इंजेक्शन देऊन वारंवार स्त्रीबीज उत्खनन केले जात असे, जे असिस्टंट रिप्रोडक्टिव टेक्नॉलॉजी कायदा २०२१ च्या तरतुदींनुसार अवैध आहे. या कायद्यानुसार, स्त्रीबीज दान केवळ एकदाच करता येते आणि त्याची व्यावसायिक विक्री प्रतिबंधित आहे. तरीही, या रॅकेटने २० हून अधिक महिलांना शोषण केले असल्याचे प्राथमिक तपासात उघड झाले आहे.

हे रॅकेट पूर्वी वंगनी येथे चालत होते आणि नंतर बदलापूरला हलवले गेले, जे या गुन्हेगारी नेटवर्कच्या गतिशीलतेचे द्योतक आहे. हे प्रकरण केवळ एका शहरापुरते मर्यादित नाही. तपासातून असे समोर आले आहे की, या रॅकेटचे धागेदोरे उल्हासनगर आणि ठाण्यातील रुग्णालयांपर्यंत पोहोचले आहेत, तसेच बेंगळुरू, तेलंगणा, नागपूर, पुणे आणि नाशिकसारख्या ठिकाणीही कनेक्शन आहेत.

यातून स्पष्ट होते की, हे एक अंतरराज्यीय नेटवर्क आहे, ज्यात आयव्हीएफ केंद्रे आणि डॉक्टरांचा सक्रिय सहभाग आहे. एका पीडित महिलेला तर ३३ वेळा स्त्रीबीज उत्खनन केले गेले, जे महिलांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर होणाऱ्या अत्याचाराचे जिवंत उदाहरण आहे. या महिलांना बनावट दस्तऐवज तयार करून फसवले जात असे, आणि त्यांच्या स्त्रीबीजाची विक्री लाखों रुपयांना होत असे. हे केवळ शोषण नाही, तर मानवी तस्करीच्या स्वरूपातील गुन्हा आहे.

या घटनेच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील इतर सामाजिक समस्या आठवतात. एकेकाळी राज्यात स्त्रीभ्रूणहत्येचे प्रमाण प्रचंड वाढले होते. गर्भलिंग निदान करणाऱ्या रुग्णालयांनी त्यातून मोठा नफा कमावला. त्या काळात कठोर कायदे आणि जागरूकता मोहिमांमुळे ते प्रमाण कमी झाले, पण आता वैद्यकीय तंत्रज्ञानाच्या नावाखाली एक नवीन प्रकारची गुन्हेगारी उफाळून येत आहे. आयव्हीएफ आणि सरोगसी सारख्या तंत्रज्ञानाचा दुरुपयोग होत असल्याचे हे उदाहरण आहे. अपत्यहीन दांपत्यांना मदत करण्याच्या नावाखाली गरीब महिलांच्या शरीराचा व्यापार केला जात आहे. हे तंत्रज्ञान महागडे असल्याने सर्वसामान्यांना परवडत नाही, आणि त्यामुळे अशा अवैध बाजाराची मागणी वाढते. अर्थशास्त्राच्या भाषेत बोलायचे तर, मागणी असते तिथे पुरवठा निर्माण होतो, पण जेव्हा हा पुरवठा मानवी शोषणावर आधारित असतो तेव्हा ते समाजासाठी अभिशाप ठरते.

या रॅकेटमागील मुख्य कारण आर्थिक असमानता आहे. गरीबीमुळे गांजलेल्या महिलांना पैशाच्या बदल्यात त्यांच्या स्त्रीबीजाचा व्यापार करणे भाग पडते, पण त्यांना त्यातील धोके आणि कायदेशीर पैलूंची माहिती नसते. हे एक प्रकारचे नकळत शोषण आहे. दुसरीकडे, अपत्यहीन दांपत्यांच्या भावनांशी खेळून या रॅकेटने करोडो रुपयांचा व्यवसाय उभा केला आहे.अवयव दानाच्या मोहिमा सुरू असतानाही किडनी किंवा यकृतासारखे अवयव मोठ्या किंमतीत विकले जातात, तसेच आता स्त्रीबीजही बाजारात उपलब्ध होत आहे. हे मातृत्वाच्या पावित्र्याला कलंक आहे. आईचे नाते हे जगातील सर्वोत्तम आणि देवापेक्षाही महान मानले जाते, पण जेव्हा त्याचा बाजार मांडला जातो तेव्हा मानवतेला काळीमा फासला जातो.

समाजाच्या दृष्टीने ही घटना एक धडा आहे. आपण पुरोगामी म्हणवतो, पण अंधश्रद्धा आणि वैद्यकीय दुरुपयोग दोन्ही बाजूंनी महिलांचे शोषण होत आहे. समाजाने या विषयावर जागरूकता निर्माण करणे गरजेचे आहे. गरीब महिलांना आर्थिक सक्षमीकरणाच्या माध्यमातून संरक्षण देणे आवश्यक आहे. तसेच, अपत्यहीन दांपत्यांना स्वस्त आणि कायदेशीर आयव्हीएफ सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासकीय योजना राबवल्या पाहिजेत.तपास यंत्रणेच्या भूमिकेबाबत बोलायचे तर, पोलिसांनी प्राथमिक कारवाई केली आहे, पण हे रॅकेटच्या मुळापर्यंत जाणे गरजेचे आहे. महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी यासाठी तपासाची मागणी केली आहे, जी योग्य आहे.हे रॅकेट केवळ बदलापूरपुरते नाही, तर इतर राज्यांपर्यंत पसरले असल्याचे संकेत आहेत. पोलिसांनी उल्हासनगर आणि ठाण्यातील रुग्णालयांची चौकशी करणे, तसेच फॉरेंसिक तपासातून मोबाइल डेटा आणि दस्तऐवज तपासणे आवश्यक आहे. आरोग्य मंत्री प्रकाश अबिटकर यांनी कठोर कारवाईचे आश्वासन दिले आहे, पण ते केवळ शब्दांपुरते मर्यादित राहता कामा नये.

शासनाची भूमिका सर्वात महत्त्वाची आहे. एआरटी कायद्याची कठोर अंमलबजावणी करणे, आयव्हीएफ केंद्रांची नियमित तपासणी करणे आणि अवैध दान प्रक्रियेवर बंदी घालणे गरजेचे आहे. तसेच, देशपातळीवर एक केंद्रीय यंत्रणा स्थापन करून अशा रॅकेट्सचा शोध घेणे आवश्यक आहे. कारण हे केवळ महाराष्ट्रापुरते नाही; इतर राज्यांतही असे बाजार सुरू असू शकतात. शासनाने गरीबी निर्मूलनाच्या कार्यक्रमांना प्राधान्य देऊन महिलांचे शोषण रोखले पाहिजे.

शेवटी, बदलापूरची घटना ही एक चेतावणी आहे. मातृत्वाचा बाजार थांबवण्यासाठी समाज, तपास यंत्रणा आणि शासनाने एकत्र येऊन काम करणे गरजेचे आहे. अन्यथा, आणखी किती महिलांचे शोषण होईल आणि किती घरांमध्ये अवैध मातृत्व फुलेल, याचा विचार करणेही भयावह आहे. हे रॅकेट बंद होऊन सर्व दोषींना कठोर शिक्षा झाली पाहिजे, जेणेकरून भविष्यात अशी घटना घडू नये. मातृत्व हे प्रेम आणि समर्पणाचे प्रतीक आहे, ते बाजाराचे साधन बनू नये.

# उपनगराध्यक्ष जितेंद्र रणशूर यांचे पद धोक्यात बनावट जात प्रमाणपत्राद्वारे मिळविले पद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी प्रतिनिधी** :- कोपरगाव नगरपरिषदेचे विद्यमान उपनगराध्यक्ष जितेंद्र रणशूर यांनी पार पडलेल्या कोपरगाव नगरपरिषदेच्या निवडणुकीत बनावट जात प्रमाणपत्राच्या मदतीने पद मिळविले असून त्यांचे पद रद्द व्हावे याबाबत अहिल्यानगर जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे अपील दाखल केले असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते सागर आहेर यांच्या वतीने गौतम बँकेच्या सभागृहात पार पडलेल्या पत्रकार परिषदेत ॲडव्होकेट मुन्ना सय्यद यांनी दिली आहे. त्यामुळे कोपरगाव शहराच्या राजकारणात खळबळ उडाली असून उपनगराध्यक्ष जितेंद्र रणशूर यांचे पद धोक्यात आले आहे.



याबाबत राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते सागर आहेर यांच्या वतीने सविस्तर माहिती देतांना ॲडव्होकेट मुन्ना सय्यद यांनी देतांना सांगितले की, पार पडलेल्या कोपरगाव नगरपरिषदेच्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक ९ ‘अ’ हा प्रभाग एस.सी. प्रवर्गासाठी राखीव होता. त्यामुळे या प्रभागातून निवडणूक लढवणारा उमेदवार हा एस.सी. प्रवर्गातील असणे आवश्यक होते. परंतु या प्रभागातून आपले नाम निर्देशनपत्र भरतांना विद्यमान उपनगराध्यक्ष जितेंद्र रणशूर यांनी आपल्या नाम निर्देशनपत्रात आपल्या जातीचा केलेला उल्लेखच चुकीचा आहे.वडिलांची जात मुलाच्या दाखल्यावर असते त्यामुळे वडिलांची जात वेगळी आणि मुलाची जात वेगळी असे असु शकत नाही. मात्र जितेंद्र रणशूर यांच्या वडिलांच्या दाखल्यावर वेगळी जात आणि जितेंद्र रणशूर यांच्या दाखल्यावर वेगळी जात असल्याचे मिळालेल्या कागदपत्रातून समोर आले आहे. त्यामुळे जितेंद्र रणशूर यांनी आपल्या नाम निर्देशनपत्रात आपल्या जातीबाबत खोटी माहिती दिली असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे प्रभाग क्रमांक ९ ‘अ’ हा प्रभाग एस.सी. प्रवर्गासाठी राखीव असतांना जितेंद्र रणशूर यांनी चुकीची माहिती देवून फसवणूक केली असून त्यांची झालेली निवड हि पूर्णत: बेकायदेशीर आहे.

त्याबाबत सर्व कागदपत्रांची पूर्तता करून अहिल्यानगर जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे अपील दाखल केले असून लवकरच न्यायालयातही अपील दाखल करणार आहे. यापूर्वी अशा प्रकरणात वेळकाढूपणा करून कारवाई करण्यात टाळाटाळ केली जात असली तरी यावेळी मात्र असे होणार नाही याची काळजी घेवून चुकीचे काम करणाऱ्यांना कोणताही वेळ मिळू देणार नाही. वेळप्रसंगी आम्ही जिल्हाधिकाऱ्याकडे किंवा न्यायालयात जावून जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे योग्य वेळेत आणि शक्य तितक्या लवकर याचा निकाल लावण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच कोल्हे गटाच्या काही नगरसेवकांनी देखील अशाच प्रकारे खोटी माहिती देवून पद मिळविले आहे. त्यांचेबाबत कागद पत्र उपलब्ध झाल्यानंतर पुढील कारवाई करणार असल्याचे ॲडव्होकेट मुन्ना सय्यद यांनी पत्रकार परिषदेत सांगितले आहे. त्यामुळे कोपरगावच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली असून जितेंद्र रणशूर यांच्या उपनगराध्यक्षपदावर टांगती तलवार या प्रकरणामुळे निर्माण झाली आहे.

## मुकींदपूर ग्रामपंचायतीत संत गाडगेबाबांना जयंतीनिमित्त अभिवादन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : तालुक्यातील मुकींदपूर ग्रामपंचायतच्या वतीने स्वच्छता अभियान राबवून संत गाडगेबाबांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

यावेळी झालेल्या जयंती कार्यक्रम निमित्त मुकींदपूर ग्रामपंचायतच्या सरपंच कल्पनाताई निपुंगे मार्गदर्शक सतीश निपुंगे, ग्रामविकास अधिकारी संतोष खंडागळे उपसरपंच सुनीता भीमराज उपळकर यांच्या हस्ते संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.



संत गाडगेबाबा यांनी समाजाला लागलेली अंधश्रद्धेची कीड दूर करण्यासाठी कीर्तनाच्या माध्यमातून प्रबोधन व समाजजागृतीचे काम केले यामध्ये आरोग्य चांगले रहाण्यासाठी त्यांनी स्वच्छतेवर अधिक भर दिला त्यांचा आदर्श समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन ग्रामपंचायतचे मार्गदर्शक सतीशदादा निपुंगे यांनी यावेळी बोलताना केले.

यावेळी झालेल्या जयंती कार्यक्रम प्रसंगी ग्रामपंचायत सदस्या भारतीताई अशोक करडक,वर्षा बाळासाहेब केदारे,मंजना खंडागळे,ग्रामपंचायत सदस्य प्रताप हांडे, सुनीता निपुंगे,दीपक डमाळे,विजय कांबळे,नंदाताई अरुण निपुंगे,अमोल घुले, मंदा प्रकाश इंगळे, कानिफनाथ कराडे,ग्रामपंचायत कर्मचारी रमेश कांडके, विशाल तिवारी,किरण निपुंगे,वैभव मगर,आकाश सरोदे, महेश थोरात उपस्थित होते

## कोपरगावात १५ कोटींच्या रस्त्यांच्या कामांना प्रारंभ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : कोपरगाव मतदारसंघाच्या पूर्व भागातील सावळीविहीर-सडे-वारी व संवत्सर-कान्हेगाव-वारी या दोन महत्त्वाच्या रस्त्यांच्या डांबरीकरणाच्या कामांना सुरुवात झाली असून नागरिकांत समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. आमदार आशुतोष काळे यांच्या पाठपुराव्यामुळे राज्य शासनाकडून तब्बल १५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.



सावळीविहीर-सडे-वारी या ५ किमी रस्त्यासाठी ५ कोटी रुपये, तर संवत्सर-कान्हेगाव-वारी या ९ किमी रस्त्यासाठी १० कोटी रुपये निधी उपलब्ध झाला आहे. ग्रामीण भागातील दळणवळण सुलभ करण्यासाठी या रस्त्यांचे महत्त्व मोठे मानले जाते. मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला हा प्रश्न आता मार्गी लागल्याने शेतकरी, दूध व्यवसायिक, विद्यार्थी, नोकरदार व प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

महायुती शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून विकासकामांसाठी निधी खेचून आणण्यात आल्याचे सांगितले जात आहे. दर्जेदार व पारदर्शक पद्धतीने काम पूर्ण व्हावे, यासाठी ग्रामस्थांनीही लक्ष ठेवावे, असे आवाहन करण्यात आले आहे. निवडणुकीत दिलेला शब्द पूर्ण करत रस्त्यांच्या कामांना प्रत्यक्ष प्रारंभ झाल्याने परिसरात आनंदाचे वातावरण आहे.

## विविध उपक्रमांनी कारेगावात शिवजयंती उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : कारेगाव येथे शिवकालिन मर्दानी खेळ सादर करीत शिवजयंती साजरी. विविध उपक्रमांकनी शिवजयंती उत्सव समितीने तालुक्यात सर्वात मोठी शिवजयंती साजरी केली.



प्रथमतः संपूर्ण गाव स्वच्छ करून गावातील सर्व मंदिरे धूवून त्यांच्यावर झेंडे पताका, विद्यूतरोषणाई करून संपूर्ण गाव भगवे झेंडे, पताका लावून सडा रांगोळ्या काढून शिवजयंती उत्सवास प्रारंभ झाला. न्यू इंग्लिश स्कूल कारेगाव यांचे झांजपथक छत्रपती शिवाजी महाराजांची पालखी मिरवणूक कार्यक्रमस्थळी पोहचले. त्यांनी सर्व गावकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले. त्यानंतर गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व नऊवस्ती शाळा या सर्वांनी छत्रपतींच्या जयघोषात मावळ्यांचे वेष परिधान केलेले मुलं भगवे झेंडे नाचवित कार्यक्रमस्थळी आणले. कार्यक्रमाच्या सुरूवातीला पाळणागित म्हणून जन्मोत्सव करण्यात आला. त्यानंतर पंचायत समितीचे माजी सभापती दिपक पटारे यांच्याहस्ते शिव पुतळ्याचेपुजन करण्यात आले. त्यानंतर छत्रपतींची आरती ढोल ताशांच्या निनादात व झांज पथकाच्या तालावर करण्यात आली. यावेळी छावाचे जिल्हाध्यक्ष नितीन पटारे यांनी गावकऱ्यांना पुढील वर्षांची शिवजयंती आम्ही सर्व गावकरी गावामध्ये शिवाजी महाराजांचा पुतळा उभारून साजरी करू, अशी शपथ घेतली. यावेळी दिपक पटारे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासाठी सर्व शासकीय परवानग्या मिळवून देण्याची ग्वाही दिली.

त्यानंतर प्राथमिक शाळा व सर्व वस्तीशाळा यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर करीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनचरित्रावरील गीते, पोवाडे सादर केली. त्याने उपस्थित सर्व गावकऱ्यांची मने जिंकली. संपूर्ण गावामध्ये शिवमय वातावरण तयार झाले होते. यावेळी काही मुलांनी छत्रपतींच्या जीवनावरील मनोगते व्यक्त केली. त्यानंतर सर्व शाळेतील मुलांना आणि गावकऱ्यांना शिवजयंती उत्सव समितीच्यावतीने मिष्टान्न भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. सायंकाळी ६ वाजता शिवकालीन युद्ध कला प्रात्यक्षिके राजे प्रतिष्ठाण नेवासा यांनी तलवारबाजी, दांडपट्टा, लाठीकाठी यासह मर्दानी आखाड्यातील संपूर्ण युद्धकला कौशल्ये सादर केली. त्या युद्ध कला कौशल्याला गावकऱ्यांनी प्रतिसाद दिला. त्यानंतर पारंपारिक वाद्यवृंदाच्या तालावर भव्य अशी मिरवणूक काढण्यात आली. त्यामध्ये सर्व तरूण मुलांनी छत्रपतींच्या जीवनावरील गीतांवर ठेका धरला. उत्सवाच्या यशस्वीतेसाठी छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष नितीन पटारे, सरपंच विजयराव पटारे, प्रशांत पटारे, रोहित उंडे, प्रशांत उंडे, अक्षय पटारे, गणेश जोशी, सागर दळे, कार्तिक डोळस, अशोक जोशी, मनोज आसणे, राजू गुंजाळ, गणेश उंडे, गोविंद पटारे, यागेश पटारे, आदी प्रयत्नशील होते.

## श्री संत गाडगे महाराजांची १५० वी जयंती उत्साहात साजरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : समाजप्रबोधन, स्वच्छता आणि व्यसनमुक्तीचा संदेश देणारे थोर समाजसुधारक संत गाडगे महाराज यांची १५० वी जयंती राहुरी शहरातील गाडगे महाराज आश्रम शाळा येथे विविध सामाजिक उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली.

या निमित्त शाळा परिसराची स्वच्छता करून विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी स्वच्छतेचा संदेश दिला. गाडगे महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले तसेच आरती करण्यात आली. प्रसाद म्हणून पिंटू शिरसाठ यांच्या हस्ते केळीचे वाटप करण्यात आले.

महाराष्ट्राला संतांची समृद्ध परंपरा लाभली असून त्या परंपरेतील गाडगे महाराज हे एक थोर समाजसुधारक मानले जातात. १८७६ साली जन्मलेल्या गाडगे महाराजांचे बालनाव डेबू होते. व्यसनमुक्ती, शिक्षणाचा प्रसार आणि स्वच्छतेचा संदेश देत त्यांनी आयुष्यभर गावोगावी फिरून लोकजागृती केली. हातात झाडू घेऊन स्वच्छतेचा आदर्श घालून दिल्यामुळे ते जनमानसात ‘गाडगेबाबा’ म्हणून ओळखले जाऊ लागले.



# थोरात कारखान्याच्या गळीत हंगामाची उद्या सांगता

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : देशातील सहकार क्षेत्रासाठी मार्गदर्शक ठरलेल्या सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखानाच्या सन २०२५-२६ या गळीत हंगामाची सांगता बुधवार, दि. २५ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९ वाजता होणार आहे. काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात व माजी आ. सुधीर तांबे यांच्या उपस्थितीत हा समारंभ पार पडणार असल्याची माहिती कारखान्याचे उपाध्यक्ष पांडुरंग पाटील घुले यांनी दिली.

घुले म्हणाले की, थोर स्वातंत्र्यसेनानी सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या आदर्श विचारांवर कारखान्यासह सर्व सहकारी संस्थांची वाटचाल सुरू आहे. कमी ऊस उपलब्धता व प्रतिकूल परिस्थिती असतानाही कारखान्याने शेतकऱ्यांना सातत्याने चांगला दर देण्याचा प्रयत्न केला आहेसमारंभात बाळासाहेब थोरात व त्यांच्या पत्नी कांचनताई थोरात यांच्या हस्ते गळीत हंगामाची औपचारिक सांगता होणार आहे. यावेळी आमदार सत्यजित तांबे, दुर्गाताई तांबे, ॲड. माधवराव कानवडे, बाजीराव खेमनर, रणजीतसिंह देशमुख, नगराध्यक्ष डॉ. मैथिलीताई तांबे, कॅन्सरतज्ञ डॉ. जयश्रीताई थोरात, सुधाकर जोशी, शंकरराव खेमनर, संपतराव डोंगरे, रामहरी कातोरे, हौशीराम सोनवणे, लक्ष्मणराव कुटे, उपनगराध्यक्ष नूर मोहम्मद शेख, राजेंद्र गुंजाळ, घुलेवाडीच्या सरपंच निर्मला राऊत यांच्यासह जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, नगरसेवक व विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. गळीत हंगाम समारंभास सर्व सभासद, ऊस उत्पादक, पदाधिकारी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संचालक मंडळ तसेच कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर यांनी केले आहे.




रमजानुल मुबारक २०२६
रोजा नंबर ०६

# ‘रोजा - इफ्तार’ आत्मिक शब्दातीत शांतता लाभेल !

पैगंबर मुहम्मद स्व.सांगतात , ‘‘ जेव्हा रोजा इफ्तार कराल तेंव्हा खजूर नें इफ्तार करावे. कारण खजूर मध्ये बरकत आहे :, जर कदाचित तुमच्या कडे खजूर नसेल तर तुम्ही दिवसभराचा रोजा पाण्याने इफ्तार करावा ‘‘ हदीस तिर्मिझी शरीफ ह. नं. ६५७).

पहाटे ४-५ ला उठून आपल्या (हलाल ) कष्टा नें आणलेल्या अन्न सूर्योदय पूर्वी सेहरी करून. संपूर्ण दिवस अल्लाह( परमेश्वर )च्या मर्जी राखण्या साठी कष्ट करून,मजुरी, नौकरी, व्यवसाय, व्यवहार अल्लाह नाराज होणार नाहीं याची प्रत्येक क्षण-क्षणी, मिनिट नं मिनिट जाणीवपूर्वक काळजी घेऊन, अल्लाह ( परमेश्वर )ची जपमाळा दिवस भर मोजून, साक्षी फक्त् अल्लाह ( परमेश्वर - भगवंत ) च आहेत, समोर उभा आपल्याला बघतो हें समजून( हलाल )कष्टाच्या कमायितून ऐपती प्रमाणे फळे, मेवे, गोड -धोड आणून संपूर्ण कुटुंबासह तसेच भावांनीही त्यांच्या कुवती नुसार एक -एक फळं आणून चहो बाजूला बसून, म्हातारी आई- वडील, छोटी बहीण, एक आजारी भाऊ, लहान लहान चिमुकली छकुली, महिलांनी बनवलेलं तळलेलं पदार्थ घेऊन, आजूबाजूच्या शेजारच्यानीं पाठवलेलं तळलेली पदार्थ घेऊन. ऑफिसचा अधिकारी, कामावरील मालक धनी दिवसभर रोजा असूनही कोणत्याही कामाचा एक टक्का काम रोजच्या प्रमाणेच करत करत, रोजाचं आत्मभान राखत आत्म्चिन्त करीत नामस्मरण चालूच ठेवत आलेल्या त्या घामाच्या कष्टाच्या फळ - खजूर नें दिवस भरातील ठेवलेल्या रोजा उपवास सोडण्याला ‘‘ इफ्तार ‘‘ करणे.

पैगंबर मुहम्मद स्व. सांगतात ,‘‘ जो व्यक्ती रोजा ठेवणाऱ्याच ‘‘ रोजा -इफ्तार ‘‘ करतील , त्याला खूप जास्त सबाब ( पुण्य ) भेटेल‘‘.

मित्रांनी प्रश्न उपस्थित ( विचारलं )केला कीं, हुजूर ( प्रेषित ) मुहम्मद स्व. आमच्या पैकी एकाची ही आर्थिक परिस्थिती( एपत - स्थिती ) अशी नाहीत कीं आम्ही दुसऱ्याला रोजा इफ्तार साठी मदत करील. -पैगंबर ( प्रेषित ) मुहम्मद स्व.नी उत्तर दिले , ‘‘ हें माझ्या मित्रांनो,पुण्याचं ( सबाब ) काम गरिबातील गरीब ही करू शकतं, साधं शुद्ध काम आहेत, घरातील पाण्याच्या एका घोट का त्याला तुम्हीं रोजा सोडताना दया ‘‘ फक्त् तुमची मनापासून मानसिकता असली पाहिजे . अल्लाह( भगवंत - परमेश्वर ) फक्त् तुमच्या मानसिकता पाहत असतो ‘‘.

तुमच्या छोट्या - छोटया शुल्लक गोष्टीची दखल अल्लाह( भगवंत - परमेश्वर ) घेऊन साबब ( पुण्य )देत असतात. कारण अल्लाह ( परमेश्वर)ला सृष्टीतील प्रत्येक जीवाची काळजी असते, प्रत्येकाला त्यालाच देणं आहेत.तो मग नास्तिक का असेना.

जगात विविध सामाजिक संघटना, राजकीय पक्ष, काही श्रीमंत व्यक्ती, सामाजिक भान असलेल्या विद्यार्थी संघटना,, मंडळ, सामाजिक ग्रुप, विविध पातळीवरील काही घटक, व्यक्तीगत, माणुसकी ची जाणीव असलेल्या व्यक्ती. महिला, आपल्या आसपासच्या विविध मस्जिद, रेल्वे स्टेशन, रेल्वे बोगीमध्ये, किंवा गल्ली गल्ली- गल्लीत, महामार्ग-हाय वे रोडच्या बाजूला छोटया छोटया टेन्ट मंडफ करून( उपवास) रोजा इफ्तार करण्यासाठी सोयीस्कर सोयी करत असतात. भारतीय संस्कृती व संस्कार हीं मानते की अन्न दान एक महान व उत्कृष्ट दान आहेत व दान देण्यात पुण्य ( साबब) आहेत म्हणून ते कशाच्या हीं पद्धतीने का होईना फक्त् करणं महत्वाचं.

सामुदायिक रित्या बसून अल्लाह( भगवंत - परमेश्वर ) कडे दिवसभारात कळत नकळत झालेल्या चुकांची( गलती ) माफी - दया -याचना - करुणा मागनी करण्याबरोबरच संपूर्ण विश्वाची सुख - शांती- समृद्धी - सुखरूप निरोगी आरोग्यासाठी- मानवतेच्या रक्षणासाठी - बंधू भाव एकता अखंडतेसाठी प्रार्थना- दुवा करून सोडलेल्या उपवासाला ‘‘ इफ्तार ‘‘ म्हणतात... यामध्ये सामुदायिक एकाता - सामुदायिक एकोपा, परस्परांची काळजी घेण्याची भावना, सहकाऱ्यांची भावना आपोआपच उपजतच निर्माण होते.

अल्लाह ( परमेश्वर - ईश्वर - भगवंत )महामानव पैगंबर मुहम्मद स्व.ना रोज़े -सेहरी -इफ्तार - तून हेच अपेक्षित आहेत.. इस्लामची शिक्षा -संस्कार,- संस्कृती आहेत.. रोजा ठेवून दिवसभर उपाशी पोटी घाम गाळून आणलेल्या रोजी नें इफ्तार करणं कसं शब्दातीत असेल.. एखाद्या दिवशी ‘‘ रोजा -इफ्तार ‘‘करून बघा, किती आत्मिक शांतता भेटेल.!‘‘



**डॉ. सलीम शेख**
बैतुशशिफा मल्टिस्पेशालिटी दवाखाना.
श्रीरामपूर, जि. अहमदनगर
मो. ९२७१६४००१४

## आरबीएनबी कॉलेजमधील गुणवंत विद्यार्थ्यांची जेईई मेन्स मध्ये उत्तुंग भरारी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : येथील रा. ब. नारायणराव बोरावके महाविद्यालयातील इ. १२ वी वर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये शासनाने घेतलेल्या जेईई मेन्स स्पर्धा परीक्षेत उत्तुंग भरारी घेतली आहे.महाविदयालयात दरवर्षी विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. इ. १२ वी नंतर असणाऱ्या नीट, जेईई, सीईटी या स्पर्धा परीक्षांची वर्षभरात चांगली तयारी करून घेतली जाते. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या वर्षी शासनाने घेतलेल्या जेईई मेन्स या परीक्षेत महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांनी घवघवीत यश प्राप्त केले आहे. या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या मीनाताई जगधने, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रवीण बडधे, ज्युनि. कॉलेजच्या उपप्राचार्या सुजाता पोखरकर सिनिअर कॉलेज विज्ञान विभागाचे उपप्राचार्य डॉ. शरद शेळके, कला विभागाचे उपप्राचार्य डॉ. अनुप दळवी, व पर्यवेक्षक प्रा. पुरुषोत्तम कासले यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

## द • ख • ल

## उंदीरगाव ग्रामपंचायत उपसरपंचपदी शेख अलमनुर अब्बास



**उंदीरगाव** : श्रीरामपूर तालुक्यातील राजकीय दृष्ट्या महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या उंदीरगाव ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदी अलमनुर अब्बास शेख यांची बिन विरोध निवड करण्यात आली. ग्रामपंचायत मध्ये मुरकुटे गटाचे बहुमत असून लोक नियुक्त सरपंच म्हणून प्रतिभा गोलवड या निवडून आल्या आहेत. रोटेशन पद्धतीने प्रत्येक सदस्याला काम करण्याची संधी मिळावी म्हणून पक्षश्रेष्ठी उपसरपंच पद हे दरवर्षी बदलत असतात.ज्ञानेश्वर बांद्रे यांनी राजीनामा दिल्या नंतर रिक्त झालेल्या जागेवर प्रथमच मुस्लिम महिलेला संधी देण्यात आली आहे. रमजान महिना सुरू असून त्यात मुस्लिम महिलेची उपसरपंच पदी नियुकी करून एक आदर्श पायंडा गावात निर्माण झाल्याने त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## श्रीरामपूर तहसील कार्यालयात गाडगे महाराज जयंती उत्साहात



**वडाळा महादेव** : श्रीरामपूर येथील तहसील कार्यालय या ठिकाणी निष्काम कर्मयोगी राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या १५० व्या जयंती उत्सवानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रसंगी तहसीलदार मिलिंद कुमार वाघ यांचे हस्ते प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. प्रसंगी निलेश इंगळे, प्रशांत पुंड, उत्तम रासकर, अमोल गाडेकर, अभया राजवळ, शितल आढाव, राजु निकाळे, सचिन रणदिवे, संदीप पाळंदे, सुनील देसाई तसेच मोठ्या संख्येने महसूल कर्मचारी उपस्थित होते. उपस्थित सर्वांचे सुनील देसाई यांनी आभार मानले.

## एकल महिलांचे सर्वेक्षण नगर परिषदेमार्फत होणार : भाऊसाहेब मोरे

**राहुरी** : शहरामध्ये एकट्या राहणाऱ्या परित्यक्ता, घटस्फोटीत, विधवा किंवा प्रौढ अविवाहित यांसारख्या एकल महिलांचे सर्वेक्षण करण्यात येणार असून यामध्ये प्रामुख्याने या महिलांची सामाजिक आर्थिक तसेच कौशल्य आधारित माहितीचे संकलन करून त्यांना आत्मसन्मानाने जगता यावे यासाठी शासनाच्या विविध विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राहुरी नगरपरिषद मार्फत राहुरी शहरातील सर्व एकल महिलांचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. राहुरी नगरपरिषदेच्या या सामाजिक उपक्रमामध्ये सहभागी होण्याचे आवाहन माजी नगराध्यक्ष डॉ.उषाताई प्रसाद तनपुरे, नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे , उपाध्यक्ष गजानन सातभाई, महिला बालकल्याण समितीच्या सभापती स्मिता भारत भुजाडी आणि मुख्याधिकारी अभिजित हराळे यांनी केले आहे.

## स्वत: सक्षम व्हा, पुढील पिढी कर्तृत्ववान घडवा : डॉ. शुभम महाराज

**माळवाडगाव** : माणसाने स्वतः स्वकृतृत्वाने सक्षम व सामर्थ्यसंपन्न बनावे अथवा आपल्या पुढील पिढीतील वंशजांना तरी कर्तृत्ववान घडवावे; अन्यथा त्याचे जीवन निष्फळ आहे, असे प्रभावी प्रतिपादन विद्यावाचस्पती आचार्य डॉ. शुभम महाराज कांडेकर यांनी येथे केले. माळवाडगाव येथे करपे परिवाराच्या वतीने आयोजित धार्मिक उत्सवात ते कीर्तनादरम्यान बोलत होते. आपल्या ओजस्वी निरूपणातून त्यांनी जीवनमूल्ये, कर्तृत्व आणि आत्मपरीक्षण यांचे महत्त्व अधोरेखित केले. मानवाला लाभलेला जन्म हा काहीतरी श्रेष्ठ साध्य करण्यासाठी आहे. मात्र भौतिक प्रगतीच्या आहारी जाऊन आपण कर्तृत्वापासून दूर जात आहोत. त्यामुळे मानवी जीवन कर्तृत्वहीन बनत चालले आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. पुढे ते म्हणाले, आपली आळशी व निष्क्रिय वृत्ती केवळ स्वतःपुरती मर्यादित राहत नाही; तिचा परिणाम पुढील पिढीवरही होतो. आपण सक्षम नसलो, तर आपल्या वागणुकीमुळे पुढील पिढीही कमकुवत होऊ शकते. त्यामुळे प्रत्येकाने आत्मपरीक्षण करून स्वतः सक्षम बनण्याचा आणि संततीला सशक्त घडविण्याचा संकल्प करावा. या प्रसंगी ह.भ.प. सुधाकर महाराज लोंढे, कैलास महाराज दुशिंग, कुणाल महाराज बोल्हे, प्रमोद आसने, संकेत महाराज ढोकचौळे, बाजार समिती संचालक गिरीधर आसने, डॉ. शंकरराव मुठे, सरपंच मीना मोरे यांसह अनेक मान्यवर व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उत्सवात कीर्तन, प्रवचन व धार्मिक विधी भक्तिमय वातावरणात पार पडले. उपस्थितांनी महाराजांच्या प्रेरणादायी विचारांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# शिवरायांच्या इतिहासातून जीवनमूल्ये घ्या : शिव व्याख्यात्या अनिता नळे

## विखे सैनिकी स्कुल येथे शिवजयंती उपक्रम



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लोणी** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सैनिक विद्यालय, लोणी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंती निमित्त आयोजित विशेष व्याख्यान कार्यक्रमात शिव व्याख्यात्या अनिता नळे यांनी विद्यार्थ्यांना छत्रपती शिवराय यांच्या व्यक्तिमत्त्वातील विविध आणि बहुधा माहीत नसलेल्या अनेक पैलूंविषयी विविध प्रसंग सांगून डोळ्यासमोर हुबेहूब तशी प्रतिमा उभी करून विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड ऊर्जा व चैतन्य निर्माण केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कमांडंट कर्नल सुभाष घोडगिरी होते. प्राचार्य राजेश माघाडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.शिवव्याख्यात्या अनिता नळे म्हणाल्या, छत्रपती शिवाजी महाराज यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शून्यातून स्वराज्याची निर्मिती केली. त्यांनी स्वराज्य ही संकल्पना केवळ राजकीय नसून सामाजिक आणि सांस्कृतिक क्रांती होती, असे स्पष्ट केले. शिवरायांच्या धैर्य, दूरदृष्टी, संघटनकौशल्य आणि लोकाभिमुख प्रशासनातून आजच्या पिढीने प्रेरणा घ्यावी, असे त्यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले.

इतिहास हा केवळ पाठ्यपुस्तकापुरता मर्यादित न ठेवता, त्यातील मूल्ये आपल्या दैनंदिन जीवनात आचरणात आणली पाहिजेत, असेही त्यांनी सांगितले. शिस्त, राष्ट्रप्रेम, स्वाभिमान आणि कर्तव्यनिष्ठा ही शिवचरित्रातून शिकण्यासारखी प्रमुख तत्त्वे असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. या विशेष प्रसंगी छत्रपतींना मानवंदना देण्यासाठी सैनिक स्कूलच्या विद्यार्थी आणि प्रशिक्षक दीपक ढोणे यांनी घोडेस्वारीची प्रात्यक्षिके करून उपस्थितांची मने जिंकली. तसेच या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवराय यांची गौरव करणारी समूह गीते गाऊन महाराजांविषयी आपली कृतज्ञता व्यक्त केली.

अध्यक्षीय मनोगतात कर्नल सुभाष घोडगिरी यांनी सैनिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी शिवरायांच्या आदर्शांचा अंगीकार करून देशसेवेसाठी तत्पर राहावे, असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी हिमालय वदक,संतोष झोटिंग,मयूर कदम,शेखर प्रधान, प्रशांत देशमुख, कॅप्टन एकनाथ धनगर आदींनी विशेष परिश्रम घेतले.राज्यगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## बस स्थानकावर आढळलेली मुलगी
### राहुरी पोलिसांकडून आई वडिलांच्या स्वाधीन



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : नाशिक जिल्ह्यातील सिन्नर येथून रागाने घरातून निघून आलेली मुलगी काही अनर्थ घडायचे आत राहुरीच्या तत्पर असलेल्या पोलीस पथकाने तिला तिच्या आई - वडीलांचे सुखरूप स्वाधीन केले आहे. मुळातच राहुरी पोलीस स्टेशनला लाभलेले पोलीस निरीक्षक संजय ठेंगे हे हरवलेल्या अल्पवयीन मुली किंवा पळवून नेलेल्या अल्पवयीन मुली किंवा घरातून रागावून गेलेल्या अल्पवयीन मुली यांच्या संदर्भात कडक धोरण अवलंबून राबविलेल्या ऑपरेशन मुस्कान अंतर्गत १०६ अल्पवयीन मुलींचा शोध घेऊन त्यांना त्यांच्या पालकांच्या सुखरूप ताब्यात दिलेले आहे. दिनांक २२ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास राहुरी पोलीस स्टेशन हद्दीत राहुरी पोलीस पथकातील पोलीस अंमलदार प्रमोद ढाकणे व नदीम शेख यांना पेट्रोलिंग करत असताना राहुरी बस स्थानकावर एक १३ वर्षीय अल्पवयीन मुलगी बस स्थानक परिसरात फिरत असताना दिसल्याने व तिच्या चेहऱ्यावरील हावभाव भेदरलेले दिसल्याने तिच्याकडे चौकशी केली असता ती सिन्नर येथून घरातुन निघून आल्याचे सांगितल्याने तिला राहुरी पोलीस स्टेशन येथे घेऊन येऊन तिचे नातेवाईकांच्या संदर्भात विचारपूस केली असता तिने तिचे वडील हे सिन्नर या ठिकाणी राहत आहेत असे सांगितल्याने सिन्नर एमआयडीसी पोलीस स्टेशन या ठिकाणी संपर्क केला असता त्यांना सदर मुलीची माहिती दिली व त्यांनी मुलीचे वडील यांच्याशी संपर्क केला व मुलगी त्यांचीच आहे असे त्यांनी कळविल्याने , (सदर अल्पवयीन मुलीचा मिसिंग-अपहरणाचा गुन्हा दाखल होणेपूर्वीच )ते सिन्नर येथून राहुरी पोलीस स्टेशन येथे येऊन त्यांची मुलगी त्यांच्या ताब्यात सुखरूप देण्यात आली आहे. राहुरी पोलिसांनी योग्य तो निर्णय घेऊन त्या अल्पवयीन मुली संदर्भात योग्य ती कारवाई केल्याने वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून तसेच नागरिकांकडूनही पोलीस पथकाचे कौतुक करत त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली आहे.

## ब्राम्हणीत झेडपी शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील ब्राम्हणी गावातील पीएमश्री जिल्हा परिषद शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन शुक्रवार २० फेब्रुवारी रोजी मोठ्या उत्साहात पार पडले. कार्यक्रम सांस्कृतिक कार्यक्रमाचा प्रारंभ श्री गणेश वंदना व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आरतीने करण्यात आला. दरम्यान देशभक्तीपर गीत,छत्रपती शिवाजी महाराज,धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा प्रेरणादायी देखावा, खंडोबा महाराज,शेतकरी,बैलगाडा शर्यत आदींसह विविध प्रकारचे नृत्य व कॉमेडी शो लक्षवेधी ठरले.



विद्यार्थ्यांच्या कलेच कौतुक करण्यासाठी पालक ग्रामस्थ व आजी-माजी विद्यार्थ्यांनी मोठी गर्दी केली होती. विविध स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांचा उत्साह व उपस्थितांच्या जल्लोषाने कार्यक्रमास अधिक रंगत आली. भव्य दिव्य रंगमंच, एलईडी स्क्रीनवर दिसणार प्रत्येक दृश्य, लाइटिंग शो मुळे कार्यक्रम भारी ठरला. ग्रामस्थांनी प्रत्येक गाण्यांमधील विद्यार्थ्यांच कौतुक करत बक्षीसांचा वर्षाव केला. शिक्षक,विद्यार्थी व शाळा व्यवस्थापन समिती सदस्य यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले.

वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमाचा शुभारंभ सरपंच सौ.सुवर्णा बानकर,झेडपीचे माजी सदस्य विक्रम तांबे, पंचायत समितीचे माजी सदस्य सुरेश बानकर,ग्रामपंचायत सदस्या संगीता वाकडे,सोसायटीचे संचालक मेजर जालिंदर पाटोळे,सुखदेव वाघ आदी मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व नारळ फोडून करण्यात आला.यावेळी मुख्याध्यापक साळभाऊ नरवडे, राजेंद्र भोर,संतोष धामणे,दीपक क्षीरसागर, वैशाली मगर,निवृत्ती धुमाळ, बाळकृष्ण देवरे,मच्छिंद्र कडाळी,स्मिता दुधाट,सयाजी साठे, शाळा व्यवस्थापन समितीचे सयाजी कर्डिले, राहुल मोकाटे, नितीन संकलेचा, महावीर चेंगडे,राम राजदेव आदींसह सदस्य ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. गत दोन तीन वर्षात शाळेतील झालेल्या बदलाचे ग्रामस्थांनी विशेष कौतुक केले. सांस्कृतिक कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन शाळेचे माजी विद्यार्थी गणेश हापसे यांनी केले.

## फार्मसी महाविद्यालयातील ३५ विद्यार्थ्यांना अजंता फार्मात नोकरीची संधी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर** : प्रवरा इन्स्टिट्युट ऑफ मेडीकल सायन्सेस अभिमत विद्यापीठाच्या कॉलेज ऑफ फार्मास्युटिकल सायन्सेसमध्ये नुकत्याच पार पडलेल्या कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये ३५ विद्यार्थ्यांची नामांकित अजंता फार्मा कंपनीत निवड झाली असल्याची माहीती प्राचार्य डॉ. रवींद्र लावरे यांनी दिली. डॉ. रवींद्र लावरे यांनी सांगितले की, या निवड प्रक्रियेत अहमदनगर जिल्ह्यासह राज्यातील एकूण २८ महाविद्यालयांतील २५० विद्यार्थ्यांनी आपले नशीब आजमावले. यामध्ये डी.फार्म, बी.फार्म, एम.फार्म तसेच बी.ई. आणि पॉलिटेक्निकच्या अंतिम वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा समावेश होता.



अजंता फार्मा कंपनीच्या वतीने मनुष्यबळ विभाग प्रमुख मनिष दत्ता, कार्यकारी अधिकारी धनश्री देसाई, उत्पादन प्रमुख नितीन आमले, गुणवत्ता विभाग प्रमुख योगेश मतकर, गुणवत्ता नियंत्रण प्रमुख रामलिगंन मुपनार आणि दुरुस्ती विभाग प्रमुख अमित देशमुख यांच्या समितीने विद्यार्थ्यांच्या तांत्रिक आणि वैयक्तिक मुलाखती घेतल्या. निवड झालेल्या ३५ पात्र विद्यार्थ्यांना गुणवत्ता हमी, उत्पादन आणि गुणवत्ता नियंत्रण यांसारख्या विभागांतील विविध पदांसाठी आकर्षक पगारश्रेणीवर नियुक्ती करण्यात आली आहे. या संपूर्ण प्रक्रियेचे नियोजन ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर शुभम कानवडे यांनी यशस्वीरित्या पार पाडले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल प्रवरा अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. राजेंद्र विखे, कुलगुरू डॉ. व्ही.एन.मगरे, विश्वस्त सुवर्णाताई विखे, विश्वस्त मोनिक सावंत, विश्वस्त ध्रूव विखे पाटील यांनी अभिनंदन केले.

# जप्त वाहनांच्या गराड्यात आश्वी पोलीस ठाणे 'गुदमरले'
## भंगार साठ्यामुळे कामकाजात आणि पार्किंगमध्ये मोठे अडथळे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी** : संगमनेर तालुक्यातील अत्यंत महत्त्वाचे आणि शिर्डी विधानसभा मतदारसंघाचा भाग असलेल्या आश्वी पोलीस ठाण्याला सध्या जप्त आणि अपघातग्रस्त वाहनांचा विळखा बसला आहे. विविध कारवायांमध्ये जप्त करण्यात आलेल्या वाहनांच्या वाढत्या संख्येमुळे पोलीस ठाण्याच्या परिसराला अक्षरशः भंगार बाजाराचे स्वरूप प्राप्त झाले आहे. यामुळे पोलिसांच्या दैनंदिन कामकाजासह, तक्रार घेऊन येणाऱ्या अभ्यागतांच्या पार्किंगसाठी जागाच उरली नसल्याचे विदारक चित्र समोर आले आहे.



आश्वी पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध वाळू वाहतूक, मद्यतस्करी, चोरी, अपघात आणि विविध भांडणांच्या प्रकरणांत पोलीस सातत्याने कारवाया करत असतात. या कारवायांदरम्यान जप्त केलेली दुचाकी, चारचाकी, मालवाहू पिकअप, ट्रॅक्टर आणि अपघातग्रस्त झालेली मोडकळीस आलेली वाहने पोलीस ठाण्याच्या आवारात आणून लावली जातात. मात्र, या वाहनांची वेळेत विल्हेवाट किंवा योग्य वर्गीकरण न झाल्याने पोलीस ठाण्यासमोर वाहनांचे मोठे 'साम्राज्य' उभे राहिले आहे.

अनेक वाहने वर्षानुवर्षे एकाच जागी उभी आहेत. यातील बहुतांश वाहनांवर न्यायालयीन प्रक्रिया सुरू असल्याने ती पोलिसांना परस्पर हलवता येत नाहीत. तर काही वाहनांची आरटीओकडून तांत्रिक तपासणी होणे अद्याप बाकी आहे. परिणामी, ही लाखो रुपयांची वाहने ऊन-पावसात धूळ खात गंजत चालली आहेत.

काही प्रकरणांमध्ये वाहनांचे मालक ही वाहने सोडवून नेण्यासाठी उत्सुक नसल्याने बेवारस वाहनांचा साठा दिवसेंदिवस वाढतच चालला आहे. आश्वी पोलीस ठाणे हे आठवडा बाजार तळाच्या शेजारी मोकळ्या जागेत आहे.

मुळात पोलीस ठाण्याची इमारत छोटी असून, त्यातच या वाहनांच्या गराड्यामुळे मोकळी जागा शिल्लक राहिलेली नाही. पोलीस ठाण्यात तक्रार घेऊन येणाऱ्या नागरिकांना आपली वाहने लावण्यासाठी जागा मिळत नाही. तसेच, पोलीस ठाण्याच्या परिसरात काम करताना कर्मचाऱ्यांनाही या भंगारामुळे मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेष म्हणजे, आश्वी पोलीस ठाण्याचा व्याप मोठा असूनही कर्मचारी संख्या मंजूर क्षमतेपेक्षा निम्मीच आहे. कामाचा ताण आणि जागेची कमतरता यामुळे पोलीस प्रशासनाची मोठी ओढाताण होत आहे. जागेच्या कमतरतेचा फटका केवळ पोलीस ठाण्यालाच बसला नसून, शेजारीच असलेल्या तलाठी कार्यालयाच्या भोवती सुद्धा मोडकळीस आलेल्या गाड्यांचा खच दिसत आहे.

यामुळे शासकीय कार्यालयांचा परिसर विद्रुपीकरणाच्या छायेत आहे. बाजारतळावर येणाऱ्या हजारो नागरिकांच्या नजरा या 'भंगार साठ्याकडे' वळत असून, पोलीस स्टेशन हे शासकीय कार्यालय वाटण्याऐवजी भंगाराचे गोदाम वाटू लागल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. या जप्त आणि अपघातग्रस्त वाहनांसाठी प्रशासनाने एखादी स्वतंत्र सुरक्षित व बंदिस्त जागा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. तसेच, ज्या वाहनांची न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण झाली आहे, त्यांचा तातडीने लिलाव करून परिसर मोकळा करावा, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे. आश्वी पोलीस ठाणे या भंगाराच्या विळख्यातून कधी मुक्त होणार आणि सर्वसामान्यांना मोकळा श्वास कधी मिळणार, असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे.

## शेतकरी विरोधी सरकारचा पुणतांब्यात तीव्र निषेध

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**पुणतांबा** : शेतकऱ्यांना मोठमोठी आश्वासने देऊन शेतकरी वर्गाची दिशाभूल करणाऱ्या राज्यातील सरकारचा पुणतांबा येथील शेतकरी वर्गाने शेतकरी विरोधी सरकारच्या विरोधात घोषणा देऊन तीव्र शब्दात निषेध केला. पुणतांबा येथील शेतकरी वर्गाने शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी १ जून २०१७ रोजी शेतकरी संपा सारखे अनोखे आंदोलन करून राज्याचे नव्हे तर संपूर्ण देशाचे लक्ष वेधले होते. शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी करावे शेतमालाला हमीभाव मिळाला पाहिजे दूधाचे भाव वाढले पाहिजे दिवसा सलग १२ तास शेतीला वीजपुरवठा केला पाहिजे. सातबारा कोरा झाला पाहिजे. यासह अनेक मागण्यासाठी आंदोलन केले होते. त्यावेळचे तात्कालिक व विद्यमान मुख्यमंत्री ना देवेंद्र फडणवीस यांनी अद्यापही आश्वासनांची पूर्तता केली नाही काल विधानसभेचे अधिवेशन सुरू झाले विरोधकांनी ह्या विषयावर सरकारला धारेवर धरले आहे. तर पुणतांबा येथील शेतकऱ्यांनी सुध्दा काल११ वाजता ग्रामपंचायत इमारती जवळ एकत्र येऊन बळीराजाच्या पुतळ्याला अभिवादन केले व लबाड सरकारचा निषेध केला यावेळी शेतकरी संपातील मुख्य शिलेदार डॉ धनजंय धनवटे, बाळासाहेब चव्हाण शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख सुहास व हाडणे, भास्कर मोटकर, सुनिल थोरात, सुनिल थोरात, श्याम धनवटे, गणेश बनकर सह मोठया संख्येने शेतकरी सहभागी झाले होते.

## उंदीरगावात नवीन हनुमान मंदिर देवस्थान उभारणीसाठी भूमिपूजन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव** : श्रीरामपूर तालुक्यातील उंदीरगाव येथे हनुमान मंदिराच्या जागेवरच नवीन हनुमान मंदिर उभारणी करण्यात येणार आहे. त्याच्या भूमिपूजनाचा शुभारंभ सरला बेट मठाधिपती महंत रामगिरी महाराज यांच्या यांच्या शुभहस्ते करण्यात आले त्यावेळी गावातील काही पती पत्नी यांनी यज्ञ, होमहवन पूजन केले.

त्यावेळी महंत रामगिरी महाराज म्हणाले की या ठिकाणी बऱ्याच वर्षापूर्वीचे हे मंदिर जुने होते.ते पण मंदिर सुंदर होते.सर्वानी येथे नवीन मंदिर उभारण्याची इच्छा व्यक्त केली.घराप्रमाणे मंदिर सुंदर झाले पाहिजे. मंदिराची प्रत्येकाला आवश्यकता असते.मंदिरात गेल्यावर माणूस टेन्शनमुक्त होतो.देवापुढं आपले मत व्यक्त केले तर मन मोकळे व हलके होते.जे धन आपल्याला दिले आहे.

त्याचा सदुपयोग करावा आपल्या धर्माचा सदुपयोग करण्याची संधी आहे मोकळ्या मनाने मंदिरासाठी सहकार्य करावे.मंदिराचे काम आपले आहे समजून हातभार लावावा.व चांगल्या प्रकारे योगदान करावे.आज भूमिपूजन झाले त्यामुळे येथे सुंदर मंदिर उभे राहील.,,यावेळी गावातील समस्त ग्रामस्थ तसेच विश्वस्त मंडळ,महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.


दि. २३/०२/२०२६.

### जाहिर नोटीस

तमाम लोकांस व विशेषतः कळविणेत येते की, महेश विश्वासराव मोरे, रा. घर क्र. १४, अ विंग, मोरया हाईट, मालदाड रोड, संगमनेर ता. संगमनेर जि. अहिल्यानगर, शिवाय - रा. माळेगाव पठार, पो. घारगांव ता. संगमनेर जि. अहिल्यानगर, शिवाय जिजामाता प्राईड, घुलेवाडी फाटा, गुंजाळवाडी ता. संगमनेर जि. अहिल्यानगर यांस कळविण्यात येते की,

आमचे अशिल भिमाशंकर कान्हु अकोलकर रा. रजनीगंधा मधुबन हौसिंग सोसायटी, मालदाड रोड, संगमनेर ता. संगमनेर जि. अहिल्यानगर यांनी दि. ०९/०२/२०२६, रोजी तुम्हास तुमचे खाते असलेल्या एच.डी.एफ.सी. बँक शाखा संगमनेर यां बँकेचा ०००१२७ हा तुम्ही सही केलेला रक्कम रु. ४,००,०००/- किंमतीचा दि. १६/१०/२०२५ रोजीचा चेक तुमचे खात्यात पुरेशी रक्कम नसल्यामुळे अनादरीत झालेला असल्याने सदर चेकमधील रक्कम रु. ४,००,०००/- मागणी करीता तुम्हास अॅड. एस.ए. हासे, संगमनेर यांचे मार्फत तुमच्या नमुद सर्व पत्यांवर मागणी नोटीस पाठविलेली होती. परंतु वर उल्लेखीत कोणत्याही पत्यावर तुम्ही मिळुन आला नाहीत. तुमच्याशी संपर्कही होत नाही. त्यामुळे सदर जाहीर नोटीसीने तुम्हास कळविण्यात येते की, वर उल्लेखीत चेक मधील नमुद रक्कम रु. ४,००,०००/- सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन कायद्याचे मुदतीत आमचे अशिलांना आणुन द्यावी अन्यथा आमचे अशिल तुमच्या विरुध्द कायदेशीर कारवाई करतील. त्याचे सर्व परिणामांची जबाबदारी तुमची राहील. ता. २३/०२/२०२६.

**अॅड. एस. ए. हासे**
**रा. लोहे मळा, कासारवाडी,**
**संगमनेर अकोले रोड,**
**इंद्रप्रस्थ लॉन्सच्या पाठीमागे,**
**ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर**
**मोबा. ९६२३३७७८२४**

### जाहीरनामा

यान्दारे सर्व लोकांना जाहीर रित्या कळविण्यात येते की अर्जदार श्री भाऊसाहेब शंकर गागरे रा. मांडवे खुर्द, ता. पारनेर, जि. अ.नगर, यांनी दिनांक २५/०९/२०२५ रोजी दाखल केलेल्या अर्जावरून सुरू करण्यात आले अर्जदार हे मांडवे खुर्द ता, पारनेर जि.अ नगर येथील रहिवासी असून अर्जदार यांची आजी नामे सरुबाई कोतु गागरे यांचा मृत्यू मौजे मांडवे खुर्द ता. पारनेर जि.अ.नगर येथे दिनांक २०/०३/१९८५ रोजी झाला असून व अर्जदार यांची आत्या नामे रखमाबाई रघुनाथ जाधव यांचा मृत्यू मौजे मांडवे खुर्द ता. पारनेर, जि.अ.नगर येथे दिनांक २४/०४/२००५ रोजी झाला असून यांची मृत्यू नोंद निबंधक तथा ग्रामपंचायत अधिकारी मांडवे खुर्द ता. पारनेर या कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे.

तरी ज्या व्यक्तींना हरकती दाखल करावयाच्या असल्यास पारनेर निबंधक तथा ग्रामपंचायत अधिकारी मांडवे खुर्द कार्यालय ३० दिवसाचे आज सुट्टीचे दिवस वगळून लेखी स्वरूपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी मदतीनंतर या तक्रारीचा विचार केला जाणार नाही कृपया याची नोंद घ्यावी

**हुकुमावरून**
**तहसीलदार पारनेर**

# पान १ वरुन

## निवडणुका घेण्यास 'सर्वोच्च' मनाई

राज्य सरकारच्यावतीनं तुषार मेहता यांनी अंतिम आदेशाच्या अधीन राहून निवडणूक घेण्यास परवानगी देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली होती. मात्र, सुप्रीम कोर्टाने अशी परवानगी देता येणार नसल्याचे म्हटले. राज्यातील राहिलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अनिश्चित काळासाठी प्रलंबित राहण्याची शक्यता आहे. प्रलंबित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम आदेशाच्या अधीन ठेवून निवडणुका घेतल्या जाऊ शकतात, अशी भूमिका राज्य सरकारच्या वतीने तुषार मेहता यांनी मांडली होती. मात्र, सुप्रीम कोर्टाने निवडणुका घेण्यास परवानगी दिलेली नाही. बांठिया आयोगाने दिलेल्या ओबीसी आरक्षणाच्या वैधतेवर सर्वोच्च न्यायालय कधीपासून सुनावणी सुरू करणार याकडे लक्ष लागलं आहे.

## अजितदादा महाराष्ट्राला न लाभलेले सर्वोत्कृष्ट : मुख्यमंत्री फडणवीस

त्यावेळी त्यांना आठवण करून द्यावी लागायची, की मी विरोधी पक्षात आहे. पुढे त्यांचे शब्द खरे ठरले आणि मी मुख्यमंत्री झालो अशी आठवणही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितली.अजितदादा हेबारामतीचा अपराजीत नेता म्हणून ओळखले जातील, यापेक्षा मोठा कुठलाही ठेवा असू शकत नाही. अजितदादांचे मामा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कट्टर स्वयंसेवक होते. दादांचे बालपण मामाकडे गेल्याने त्यांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघ काय आहे, हे माहिती होते. राजकारणात अनेक दादा होऊन गेले, पण महाराष्ट्रात वसंतदादा आणि अजितदादा अशी दोन नावे आहेत,ज्यांना महाराष्ट्र कामासाठी लक्षात ठेवेल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

## तुकाराम मुंडे यांच्याकडे परभणीच्या पालक सचिव पदाची जबाबदारी

गडचिरोलीचे पालक सचिव म्हणून यापूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अप्पर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर यांची नियुक्ती केली होती. आता राज्याचे मुख्य सचिव राजेश अगरवाल हे गडचिरोलीचे पालक सचिव असणार आहेत. वर्ध्याचे पालक सचिव म्हणून महिला व बालविकास विभागाचे सचिव अनुपकुमार यादव होते. त्यांच्या जागी आता मिलिंद म्हैसकर पालक सचिव असणार आहेत. इकबाल सिंह चहल हे मुंबई शहरचे पालक सचिव होते. पण ३१ मार्च २०२६ रोजी ते सेवानिवृत्त होत आहेत. त्यांच्या जागी कौशल्य, रोजगार नाविन्यता व उद्योजगता विभागाच्या अ.मु.स. मनिषा वर्मा यांची नियुक्ती झाली आहे. परभणीचे पालक सचिव म्हणून जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दिपक कपूर यांच्याकडे जबाबदारी होती. त्यांच्या जागी दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांची नियुक्ती झाली आहे. मृद व जलसंधारण विभागाचे सचिव गणेश पाटील हे वाशिमचे पालक सचिव होते. आता मराठी भाषा विभागाचे सचिव किरण कुलकर्णी यांच्याकडे नवी जबाबदारी दिली आहे. रत्नागिरीच्या पालक सचिव म्हणून सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व विशेष चौकशी अधिकारी (१) श्रीम. सीमा व्यास जबाबदारी पार पाडत होत्या. पण इतर मागास व बहुजन कल्याण विभागाचे सचिव आप्पासो धुळाज हे नवे पालक सचिव असणार आहेत.

## थकबाकीमुळे २५ लाख शेतकऱ्यांसाठी बँकांचे दरवाजे बंद!

माहिती सहकार विभागाकडून मागविली आहे.राज्यात मागील पाच वर्षांपासून दररोज सरासरी सात शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत असल्याचे मदत व पुनर्वसन विभागाच्या अहवालात नमूद आहे. अमरावती, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, नागपूर, पुणे या विभागात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या आहेत. नापिकी, पिकांना हमीभाव नाही, अतिवृष्टी, महापूर व दुष्काळामुळे थकबाकीत गेलेल्या २५ लाख शेतकऱ्यांसाठी या पार्श्वभूमीवर दीर्घकालीन उपाययोजना केल्या जाणार असून, त्यासाठी माजी सनदी अधिकारी प्रवीणसिंह परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे. मार्चअखेर समितीचा अहवाल राज्य शासनाला सादर होईल. तत्पूर्वी, शेतकऱ्यांना राज्य सरकार कर्जमाफीतून मोठा दिलासा देणार आहे. पण, थकबाकीची रक्कम पाहता सातबारा कोरा होणार नाही हे निश्चित मानले जात आहे. शेतकऱ्यांचे तीन लाखांपर्यंतचे थकीत पीक कर्ज माफ होण्याची शक्यता असून बाकीचे कर्ज फेडीसाठी मुदत मिळेल. पाच वर्षांतील नियमित कर्जदारांना ५० हजार ते एक लाखांचे प्रोत्साहनपर अनुदान देण्याचा सरकार विचार करू शकते. 'एकरकमी परतफेड योजने'तून कर्जमाफी घेणाऱ्या शेतकऱ्यांना पुन्हा नव्याने कर्ज देण्याचाही विचार सरकार करत आहे.

# मुख्यालयी राहुन रुग्णांना चोवीस तास सेवा द्यावी : आ. प्रशांत बंब

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी व रुग्णांसाठी साडेसहा कोटी रुपये खर्च करून लासुर स्टेशन प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी अद्ययावत इमारत बांधण्यात आली आहे. येथे येणाऱ्या रुग्णांना मुख्यालयी राहून प्रामाणिकपणे चोवीस तास सेवा देण्याचे आवाहन आ. प्रशांत बंब यांनी आरोग्य विभागाला केले.



तालुक्यातील लासुर स्टेशन प्राथमिक आरोग्य केंद्राच्या नवीन इमारतीचे लोकार्पण करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते यावेळी व्यासपीठावर अभयानंदगिरीजी महाराज सभापती शेषराव जाधव जि. प. सदस्या संगीता आमराव, प.स. सदस्या कविता चव्हाण, प.स. सदस्य सुनील पाखरे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ अभय धानोरकर तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ रंगनाथ तुपे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमोल जाधव, भाजपाचे तालुकाध्यक्ष रवींद्र चव्हाण, आ. बंब यांचे स्वीय सहाय्यक रज्जाक पठाण, गोपाल वर्मा, माजी सरपंच मीना संजय पांडव, गणेश व्यवहारे, संदीप आमराव, प्यारेलाल शहा, नारायण वाकळे, बाजार समितीचे संचालक मनीष पोळ, दादासाहेब तायडे, भाऊसाहेब चिंधे यांच्यासह वैद्यकीय अधिकारी कर्मचारी माजी ग्रामपंचायत सदस्य अशा सेविका बाजार समितीचे संचालक व ग्रामस्थांची उपस्थिती होती

## पुरवठा विभागात शिधापत्रिका कामांसाठी शासकीय कर्मचारी नेमणुकीची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** तहसील कार्यालयातील पुरवठा विभागात शिधापत्रिकेसंदर्भातील कामांसाठी शासकीय कर्मचारी नेमणूक करण्यात यावी, अशी मागणी तहसीलदार नवनाथ वगवाड यांच्या कडे करण्यात आली आहे. दिलेल्या निवेदनात म्हटले की पुरवठा विभागात शिधापत्रिका संदर्भातील विविध कामांसाठी दररोज मोठ्या प्रमाणावर नागरिकांची गर्दी होत असते. सध्या ही कामे प्रायव्हेट कर्मचाऱ्यांमार्फत केली जात असल्याचे दिसून येत असून, याबाबत नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. शिधापत्रिका हे सर्वसामान्यांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित अत्यंत महत्त्वाचे शासकीय काम असल्याने या विभागात अधिकृत शासकीय कर्मचाऱ्यांची नेमणूक करणे आवश्यक आहे.कामकाज पारदर्शक, शिस्तबद्ध व नियमांनुसार व्हावे तसेच नागरिकांना सुलभ सेवा मिळावी, यासाठी तात्काळ शासकीय कर्मचारी नेमणूक करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे यावेळी एम आय एमचे शहराध्यक्ष फैसल बासोलान, युवा शहराध्यक्ष नदीम खान, सचिव इम्रान खान, समीर शेख, अबरार पटेल उपस्थित होते.

# डिंभे उजवा-डावा कालवा व घोड शाखेत पाण्याचे आवर्तन सुरू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई :** फेब्रुवारी महिना अजून संपला नसतानाही उन्हाची तीव्रता वाढल्याने शिरूर व आंबेगाव तालुक्यात पाण्याची टंचाई जाणवत होती. या भागातील शेतकऱ्यांच्या शेतीसाठी उपलब्ध जलस्रोत कमी पडत असल्यामुळे तातडीने उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली होती.



याच पार्श्वभूमीवर विधानसभा प्रतिनिधी व माजी सहकार मंत्री दिलीपराव वळसे पाटील यांनी कुकडी सिंचन मंडळ, पुणे येथील अधीक्षक अभियंत्यांना डिंभे उजवा, डावा कालवा आणि घोड शाखेत पाणी सोडण्याबाबत पत्र पाठवले. तसेच राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याशी झालेल्या सकारात्मक चर्चेनंतर पाणी आवर्तन सुरू करण्याचा निर्णय घेतला गेला.

यामुळे रविवार, दि. २२ रोजी सकाळी डिंभे उजवा व डावा कालवा तसेच घोड शाखेत पाणी पुरवठा सुरू झाला असल्याची माहिती आंबेगाव तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष विष्णू हिंगे यांनी दिली. ऐन उन्हाळ्याच्या तोंडावर कालव्यांना पाणी सोडल्याने या भागातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

पाण्यामुळे शेतकऱ्यांना पिण्याचे पाणी, शेतीमाल, जनावरांचे चारा पिके आणि विहिरींमध्ये पाणी वाढवण्यासाठी मोठा फायदा होणार आहे. नागरिक आणि शेतकरी बांधवांनी अपेक्षा व्यक्त केली आहे की, नियोजनबद्ध पद्धतीने सोडलेले पाणी सर्वांना सारखे आणि मुबलक मिळावे.

# संगमनेर नगरपरिषदला 'माझी वसुंधरा अभियान' अंतर्गत राज्यस्तरीय पुरस्कार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** महाराष्ट्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी उपक्रम असलेल्या 'माझी वसुंधरा अभियान ४.०' अंतर्गत संगमनेर नगरपरिषदेला राज्यस्तरीय पुरस्काराने आज सन्मानित करण्यात आले. मुंबईतील वरळी येथील सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियम येथे पार पडलेल्या भव्य सन्मान सोहळ्यात बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, विधानसभेचे सभापती राहुल नार्वेकर यांच्यासह संगमनेर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी दयानंद गोरे व नगरसेवक किशोर टोकसे उपस्थित होते..

लोकनेते बाळासाहेब थोरात माजी आ. डॉ. सुधीर तांबे आणि तत्कालीन नगराध्यक्ष दुर्गाताई तांबे यांनी पर्यावरणाबाबत

> पर्यावरण संरक्षण ही स्पर्धा नसून आपली सामूहिक जबाबदारी आहे. आज मिळालेला हा सन्मान सर्व संगमनेर करांचा असून भविष्यातही अधिक जोमाने काम करण्याची प्रेरणा देणारा ठरेल
>
> **– डॉ.मैथिली तांबे**

५० हजार ते १ लाख लोकसंख्या गटातील अमृत शहरांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल हा बहुमान प्रदान करण्यात आला.

यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या हस्ते संगमनेर शहराच्या नगराध्यक्ष डॉ. मैथिलीताई तांबे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी राज्याचे मा.राज्यपाल आचार्य देवव्रत, पर्यावरण व वातावरणीय संगमनेर नगर परिषदेच्या वतीने विविध उपक्रम राबवले. या कार्यक्रमाची दखल घेऊन संगमनेर नगर परिषदेला राज्य व राष्ट्रीय पातळीवर अनेक पुरस्कार मिळाले.

हाच वारसा जोपासताना आमदार सत्यजित तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरणाच्या पंचतत्त्वांपैकी भूमी, जल, वायु, अग्नी आणि



आकाश यांच्या संवर्धनासाठी राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांमुळे संगमनेर नगरपरिषदेला हा मान मिळाला आहे. स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन, जलसंवर्धन, वृक्षारोपण आणि प्रदूषण नियंत्रण या क्षेत्रांत सातत्यपूर्ण आणि प्रभावी कामगिरी केल्याने संगमनेरने राज्याच्या नकाशावर आपला ठसा उमटवला आहे.

हा पुरस्कार केवळ नगरपरिषदेचा नसून, शहर स्वच्छ, सुंदर आणि प्रदूषणमुक्त ठेवण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेणाऱ्या अधिकारी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी आणि नागरिकांचा सामूहिक सन्मान असल्याची भावना डॉ.मैथिली तांबे यांनी व्यक्त केली.

संगमनेर नगर परिषदेला हा पुरस्कार मिळाल्याबद्दल लोकनेते बाळासाहेब थोरात ,मा. आ.डॉ सुधीर तांबे ,आमदार सत्यजित तांबे, सौ दुर्गाताई तांबे, डॉ.जयश्रीताई थोरात उपनगराध्यक्ष नूर मोहम्मद शेख सर्व नगरसेवक, नगरसेविका मुख्याधिकारी दयानंद गोरे यांनी अभिनंदन केले आहे.

# निधन वार्ता

## गंभा. सखुबाई गागरे



**साकुर :** पारनेर तालुक्यातील मांडवे खुर्द येथील रहिवाशी असलेल्या गं. भा. सखुबाई तुळशीराम गागरे यांचे (वय ७९) वृद्धपकाळाने निधन झाले आहे.

त्यांच्या पश्चात २ मुले ७ मुली सून जावई नातवंडे प पचवंडे असा मोठा परिवार आहे. त्या मांडवे खुर्द ग्रामपंचायत क्लार्क रावसाहेब गागरे व सामाजिक कार्यकर्ते विठ्ठल गागरे यांच्या मातोश्री होत्या. तर भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संतोष शेठ वाडेकर यांच्या आजी होत्या.

## सुमनबाई औटी



**राहुरी :** तालुक्यातील ताहाराबाद येथील सुमनबाई बाबुराव औटी (वय-७५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात १ मुलगा, ४ मुली, दीर, पुतणे, सुना व नातवंडे असा परिवार आहे. शिवाजी औटी यांच्या त्या मातोश्री होते.

## बबन कल्हापुरे



**सोनई :** जवळील श्रीरामवाडी येथील सेवानिवृत्त शिक्षक बबन माधव कल्हापुरे (वय ८१) यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. शिक्षक बँकेचे सहायक व्यवस्थापक अनिल कल्हापुरे, संगीता कावरे, जयश्री काचोळे यांचे ते वडील तर, खंडाबा येथील सेवानिवृत्त प्रकाश काचोळे यांचे ते सासरे तर होत.

# सावता सेनेच्या पुणे जिल्हाध्यक्षपदी गायकवाड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई :** मागील अनेक वर्षांपासून समाजातील विविध घटकांना विविध प्रकारची मदत,सहकार्य करीत अल्पावधीत आपल्या कार्याची चुणूक दाखवत दखल घ्यावी असे कार्य करीत असलेले शिरूर तालुक्यातील मूळ कवठे येमाईच्या माळीमळा (गांजेवाडी) येथील मूळ रहिवासी असलेले व सध्या शिक्रापूर,तळेगाव ढमढेरे परिसरात व्यवसाय निमित्ताने कार्यरत असणारे विशाल हरिभाऊ गायकवाड यांची नुकतीच महाराष्ट्र राज्य सावता सेनेच्या पुणे जिल्हाध्यक्षपदी निवड झाली आहे. त्यांच्या या निवडीचे पत्र सावता सेना महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष मुंजाजी गोरे यांच्या होते व संत शिरोमणी सावता महाराज यांच्या मुलीचे सतरावे वंशज दादा महाराज वसेकर व मान्यवरांच्या उपस्थितीत देण्यात आले.यावेळी विष्णु देवकर, ठकसेन तुपे, दादा राऊत,



जगन्नाथ रोठे,स्वाती ताई गोरे, सारिका ताई भुजबळ, चित्रा ताई परंडवाल, संजिवनी ताई कापरे उपस्थित होते.


**माझे जुने नाव मनीषा प्रशांत उपाध्ये (माझे स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा राहता चे कागदपत्रावरील नाव) असे झाले असून माझे नवे नाव माधुरी प्रशांत उपाध्ये (माझे आधार कार्ड वरील नाव) असे आहे या दोन्ही नावाच्या व्यक्ती मी एकच असून अन्य दुसरी व्यक्ती नाही .**

**प्रतिज्ञापत्र=क्र.२४५२२४२०४ १२६८१००५१३५९२ दिनांक ०५/०९/२०२४**

**CHANGE OF NAME**

I have changed my name from **Abhishek Mukundrao Thombare** (Old Name) to **Abhishek Mukund Thombare** (New Name) As per new passport rules.
Adress - Kanhegoan road, Padhegoan, Ahmednagar, 413721, Maharashtra, India

**Change of name**

Old name: is on my QURESHI MATIN SALEEM IS ON MY SECONDRY SCHOOL CERTIFICATE. and My New Name is MATIN SALEEM KURESHI as on Aadhar Card Number is 4897 6874 8736 (23/02/2025)



जा ७७६०/२५ 
नेमलेली तारीख १८/०३/२०२६

सौ. अनघा शैलेश भारदे 
ॲडव्होकेट 
निशाणी क्र. १०

## जाहीर घोषणा

अहमदनगर येथील मे. दिवाणी न्यायाधिश साहेब, एस.डि. कोर्ट नं.६ यांचे कोर्टात 
किरकोळ सिव्हील चौकशी अर्ज क्र. १६१/२०२५

**अर्जदार :** कमल आत्माराम कुसळकर 
रा. वडारवाडी, ता. शेवगांव जि. अहिल्यानगर 
X 
**सामनेवाले :** कोणीही नाही

**तमाम लोकांस या जाहीर घोषणेने कळविण्यात येते की,**

अर्जदार हया वरील ठिकणच्या कायमस्वरुपीच्या रहिवासी असून प्रमिला शेटीबा कुसळकर हया अर्जदार यांची सख्खी बहिण आहे. प्रमिला शेटीबा कुसळकर व शेटीबा बाबुराव कुसळकर यांचे लग्न संबंधातुन प्रकाश आत्माराम कुसळकर हा मुलगा झाला. अविवाहीत मुलगा प्रकाश आत्माराम कुसळकर हे दि.१४/०३/२०१९ रोजी मयत झाले. तदनंतर आत्माराम बाबुराव कुसळकर हे दि.५/८/२०२३ रोजी मयत झाले. तदनंतर प्रमिला शेटीबा कुसळकर यांचा संभाळ त्यांची सख्खी बहिण अर्जदार हया करत होत्या. प्रमिला शेटीबा कुसळकर हया दि.०८/०५/२०२५ रोजी मयत झाल्या, प्रमिला शेटीबा कुसळकर हया मयत झाल्यानंतर त्यांचा अंत्यविधी व उत्तर कार्य अर्जदार यांनी सख्खी बहिण या नात्याने केले. मयत प्रमिला शेटीबा कुसळकर यांचे प्रथम वारस त्यांचे पती व मुलगा त्यांचे आगोदरच मयत झाले असल्याने त्यांना त्यांची सख्खी बहिण अर्जदार यांचेशिवाय दुसरे वारस नाहीत. याप्रकारे मयत प्रमिला शेटीबा कुसळकर यांना अर्जदार हे हिंदू वारस कायदयानुसार वारस आहेत मयत प्रमिला शेटीबा कुसळकर यांचे नावे खाली नमुद केलेल्या तपशीलाची मुदत ठेव पावत्या रक्कम गुंतवलेली आहे व बचत खात्यामध्ये रक्कम आहे.

| क्रेडी सोसायटीचे नांव | ठेव पावती नं. | रक्कम गुंतविल्याची दिनांक | मुदत ठेव रक्कम | मुदत संपल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| रेणुकामाता मल्टीस्टेट को-ऑप. अर्बन सोसा. अ.नगर शाखा शेवगांव | ११८२९८ | १९/०७/२०२२ | रु.३,५०,००० | १९/०८/२०२३ |
| | ११८२९९ | १९/०७/२०२२ | रु.३,५०,००० | १९/०८/२०२३ |

| क्रेडी सोसायटीचे/बँकेचे नांव | बचत खाते | रक्कम |
|---|---|---|
| रेणुकामाता मल्टीस्टेट को-ऑप. अर्बन सोसा. अ.नगर शाखा शेवगाव | १०२१०४००३०००००२२ | २०८०८४/- व त्यावर होणारे पुढील व्याज |
| दि अहमदनगर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑप. बँक लि. शाखा शेवगांव टाऊन | १०/०१८/०११००४ | रु.३९७१०/- व त्यावर होणारे पुढील व्याज |

अर्जदार यांना वर नमुद बँकेतील व क्रेडीट सोसायटीमधील रकमा मिळणेसाठी अर्जदार यांनी मयत प्रमिला शेटीबा कुसळकर यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी मे. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

सबब सदर अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर सदर जाहीर घोषणा प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याचे आत या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात. मुदतीत आपल्या कोणाच्याही, कोणत्याही हरकती न आल्यास न्यायालय लागलीच अर्जदार यांचा पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे इस्टेटिचे वारस प्रमाणपत्र देईल व मग कोणतीही हरकत चालणार नाही, कळावे.

दिनांक ०४/०८/२०२५

शिक्का

**बेंच क्लार्क** 
**दिवाणी न्यायालय, व.स्तर अ.नगर**

**हुकूमावरुन** 
**सहाय्यक अधिक्षक** 
**दिवाणी न्यायालय, व. स्तर अ.नगर**


## राजेवाडीमध्ये जल संवर्धनासाठी संत निरंकारी मिशनचे स्वच्छता अभियान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**माळशिरस :** राजेवाडी, पुरंदर येथे रविवार (ता. २२) संत निरंकारी मिशनच्या वतीने 'प्रोजेक्ट अमृत' अंतर्गत 'स्वच्छ जल, स्वच्छ मन' या स्वच्छता अभियानाचा चौथा टप्पा संपन्न झाला. सकाळी ८ ते ११ वाजेपर्यंत राजेवाडी, पिसर्वे तसेच पुणे जिल्ह्यातील ४२ ठिकाणी नद्यांमधील आणि शहरातील तलावांमधील स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

संत निरंकारी मंडळाचे सचिव जोगिंदर सुखीजा यांनी सांगितले की, हा उपक्रम देशभरातील १५०० हून अधिक ठिकाणी एकाच वेळी पार पडला. अभियानाचा मुख्य उद्देश पाण्याचे महत्त्व समजावणे आणि नागरिकांमध्ये त्याचे संरक्षण करण्याची जागरूकता निर्माण करणे हा आहे.

मोहीम संपन्न झाल्यानंतर राजेवाडी व पिसर्वे येथे सत्संगाचे आयोजन करण्यात आले, ज्याद्वारे बाहेरील स्वच्छतेसोबत मनाच्या आंतरिक शुद्धीचा संदेशही दिला गेला. सतगुरु माता सुदीक्षा जी महाराजांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम जलसंवर्धनाला जीवनशैली, संस्कार आणि सेवाभाव म्हणून स्वीकारण्याची प्रेरणा देतो, ज्यातून स्वच्छ जल, स्वच्छ मन आणि स्वच्छ समाज घडवता येईल.



## नशिबाची परिक्षा

**मंगळवार दि . २४ फेब्रुवारी २०२६**

### मिलनम डे

उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत

१२५ २६० ४४० | ८-१ | १३७ ३८० ३३५ | जोड ८०-४१-२५-९७-१६

### कल्याण

उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत

१३६ ३७० ३३४ | ०-२ | १५६ २४६ ६६० | जोड ०६-४२-१८-३५-२९

### मुंबैम (मेन)

उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत

३९० ४८० २२८ | २-८ | १७० ३५० ८०० | जोड २१-३८-६४-७९-८०

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 10/11/2025 to 14/11/2025 | 356 40 479 | 900 92 237 | 279 89 667 | 350 81 137 | 579 10 280 |
| 17/11/2025 to 21/11/2025 | 156 29 135 | 190 05 799 | 460 03 490 | 233 87 269 | 149 43 256 |
| 24/11/2025 to 28/11/2025 | 335 19 900 | 689 35 690 | 247 38 800 | 120 36 150 | 116 81 678 |
| 01/12/2025 to 05/12/2025 | 688 20 488 | 460 00 145 | 128 17 223 | 168 57 377 | 239 45 177 |
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 22/12/2025 to 26/12/2025 | 220 41 470 | 160 76 466 | 600 67 449 | 680 47 340 | 336 27 368 |
| 29/12/2025 to 02/01/2026 | 259 63 599 | 340 75 348 | 250 71 344 | 136 05 140 | 123 64 699 |
| 05/01/2026 to 09/01/2026 | 477 86 178 | 458 73 580 | 355 34 338 | 239 46 259 | 123 67 188 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | 134 87 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |

✻ वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये ✻

## द • ख • ल

### मंगल कार्यालय व्यावसायिकाला दमदाटी, अदखलपात्र गुन्हा

**अहिल्यानगर** : केडगाव परिसरातील एका मंगल कार्यालय व्यावसायिकाला मोबाईलवरून शिवीगाळ करून दमदाटी केल्याची घटना समोर आली असून, याप्रकरणी सोमवारी (दि. २३ फेब्रुवारी) कोतवाली पोलीस स्टेशन येथे अदखलपात्र गुन्हा नोंदविण्यात आला आहे. तक्रारदार प्रफुल्ल नवनीत सुरपुरिया (रा. विनायक नगर, केडगाव) हे मंगल कार्यालय व्यवसायाशी संबंधित आहेत. रविवारी (दि. २२ फेब्रुवारी) रात्री त्यांना पोपट कराळे यांनी मोबाईलद्वारे संपर्क साधला. संभाषणादरम्यान तू कमी किमतीत मंगल कार्यालयाची सुपारी देतोस, त्यामुळे आमच्या व्यवसायाचे नुकसान होत आहे, असा आरोप करत सुरपुरिया यांना शिवीगाळ करण्यात आली तसेच दमदाटी करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. घटनेनंतर प्रफुल्ल सुरपुरिया यांनी त्वरित कोतवाली पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. त्यांच्या तक्रारीवरून संबंधित व्यक्तीविरोधात अदखलपात्र गुन्ह्याची नोंद करण्यात आली असून पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे.

### नगरपरिषदेत संत गाडगे महाराज जयंती उत्साहात



**लिंपणगाव** : श्रीगोंदा नगरपरिषदेच्या वतीने संत गाडगे महाराज जयंती उत्साहात व भक्तीभावाने साजरी करण्यात आली. या निमित्ताने नगराध्यक्ष सुनितताई खेतमाळीस यांच्या हस्ते संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी संत गाडगे महाराज यांच्या कार्याचा गौरवपूर्ण आढावा घेण्यात आला. स्वच्छता, सामाजिक समता, अंधश्रद्धा निर्मूलन आणि समाजप्रबोधन यासाठी त्यांनी केलेल्या कार्याची आठवण उपस्थितांनी यावेळी करून दिली. त्यांच्या विचारांचा आदर्श ठेवून शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला. यावेळी मुख्याधिकारी पुष्पगंधा भगत, उपनगराध्यक्ष अलका अनभुले, नगरसेवक तसेच नगरपरिषदेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमानंतर परिसरात स्वच्छता जनजागृतीचा संदेश देण्यात आला. संत गाडगे महाराजांच्या जयंतीनिमित्त श्रीगोंदा नगरपरिषदेकडून शहरात विविध सामाजिक उपक्रम राबविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

### लग्नातील सत्कार टाळून जि प शाळेसाठी २१ हजारांची देणगी

**चापडगाव** : शेवगाव तालुक्यातील गदेवाडी येथील सामाजिक कार्यकर्ते रामनाथ लेंडाळ यांनी आपल्या चिरंजीवांच्या विवाहप्रसंगी होणारा सत्कार समारंभ टाळून सामाजिक बांधिलकीचे उदाहरण घालून दिले. त्यांनी जिल्हा परिषद शाळा, गदेवाडी येथील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी रुपये २१,००० इतकी रक्कम देणगी म्हणून प्रदान केली.

ही रक्कम शाळेच्या ग्रंथालय व इतर शैक्षणिक उपक्रमांसाठी वापरण्यात येणार असल्याची माहिती शाळा व्यवस्थापन समितीने दिली. या स्तुत्य उपक्रमाबद्दल शाळा व्यवस्थापन समिती, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद तसेच ग्रामस्थांनी लेंडाळ यांचे मनःपूर्वक आभार मानले. त्यांच्या या कृतीमुळे समाजात शिक्षणाबाबत सकारात्मक संदेश गेला असून इतरांनीही अशा सामाजिक कार्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

### राष्ट्रीय स्केटिंग स्पर्धेत अहिल्यानगरच्या रावीला 'कांस्य पदक'



**अहिल्यानगर** : रोलर स्पोर्ट्स कोच फेडरेशन ऑफ इंडियाच्यावतीने नागपूर येथे आयोजित पहिल्या राष्ट्रीय स्तरावरील स्केटिंग स्पर्धेत अहिल्यानगरच्या कु. रावी दिनेश देशपांडे हिने चमकदार कामगिरी करत ४ ते ६ वयोगटात कांस्य पदक पटकावले आहे. रावीच्या या यशामुळे तिचे कौतुक होत आहे. नागपूर येथे १४ फेब्रुवारी २०२६ रोजी पार पडलेल्या या स्पर्धेत देशभरातील विविध राज्यांतील खेळाडूंनी सहभाग घेतला होता.

अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या या स्पर्धेत रावीने आपल्या स्केटिंग कौशल्याच्या जोरावर कास्य पदकावर आपले नाव कोरले. रावी ही अहिल्यानगर शहरातील 'टीम एम स्पोर्ट्स अकादमी'ची खेळाडू असून, तिला प्रशिक्षक प्रमोद डोंगरे आणि शुभम करपे यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

# आढळगावात सरपंचांचे आमरण उपोषण

## रखडलेली कामे तातडीने पूर्ण करण्याची मागणी




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : तालुक्यातील आढळगाव येथे विद्यमान सरपंच शिवप्रसाद भाऊसाहेब उबाळे यांनी ग्रामस्थांसह आमरण उपोषणास प्रारंभ केला आहे. सतत खंडित होणारा वीज पुरवठा, वर्षानुवर्षे रखडलेले ५४८-ऊ राष्ट्रीय महामार्गाचे काम आणि इतर अपूर्ण विकासकामांच्या निषेधार्थ हा लढा उभा राहिला आहे. गावात गेल्या अनेक दिवसांपासून विजेचा लपंडाव सुरू आहे. शेतकरी, ग्रामस्थ आणि शालेय विद्यार्थ्यांचे हाल होत असून, विजेअभावी पिकांचे नुकसान वाढले आहे. शेतकऱ्यांनी स्टार्टर सुरू केला तरी शेतापर्यंत वीज पोहोचत नाही-हा रोजचा अनुभव असल्याचे सरपंच उबाळे यांनी ठामपणे मांडले.

दरम्यान, आढळगाव येथील ५४८-ऊ राष्ट्रीय महामार्गाचे काम अनेक वर्षांपासून अपूर्ण आहे. रस्त्याच्या दुर्दशेमुळे वाहतूक खोळंबते, अपघात वाढले आहेत, आणि काहींना प्राणही गमवावे लागले-ही वस्तुस्थिती ग्रामस्थांनी संतापाने मांडली. आढळगाव एस.टी. स्टॅण्ड परिसर, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयासमोर गतिरोधक, तसेच गटार लाईन, पथदिवे व रस्ता दुभाजक तातडीने बसविण्याची मागणी करण्यात आली आहे.तांदळी सबस्टेशन येथे मंजूर सौरऊर्जा प्रकल्प दोन वर्षांपासून रखडलेला असून, अधिकारी-ठेकेदारांच्या उदासीनतेमुळे काम पूर्ण झालेले नाही.

हा प्रकल्प कार्यान्वित झाल्यास परिसरातील विजेचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटू शकतो, असे सरपंच उबाळे यांनी स्पष्ट केले.या उपोषणास मा. सेवा संस्थेचे चेअरमन दत्तात्रय चव्हाण यांनी पाठिंबा दर्शविला. प्रशासनाने शेतकऱ्यांच्या वीज प्रश्नावर तातडीने निर्णय घ्यावा, अशी त्यांनी मागणी केली.प्रशासनाने आठ दिवसांत वीज व रस्त्याचा प्रश्न सोडवला नाही तर सोमवार, दि. २३ फेब्रुवारी २०२६, रोजी सकाळी ९ वाजता आढळगाव एस.टी. स्टॅण्ड येथील छत्रपती शिवाजी महाराज ओटा येथे ग्रामस्थांसह आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा यापूर्वी देण्यात आला होता.

त्यानुसार आज उपोषण सुरू झाले असून प्रशासनाची पुढील भूमिका काय राहणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.यावेळी सामाजिक कार्यकर्ते तुकाराम अण्णा वाकडे, माजी सभापती विलासराव भैलुमे, सत्यवान शिंदे, धनंजय सूर्यवंशी, चंदू तांबुळी, राम भालेराव, बबन आबा काळे यांच्यासह आढळगावातील असंख्य ग्रामस्थ उपस्थित होते.

### मनुष्य आजारात डॉक्टरांवरच सर्वाधिक विश्वास ठेवतो : हभप आदिनाथ महाराज



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अमरापूर** : शेवगाव आखेगाव रोडवरील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयासमोर नव्याने स्थलांतरित झालेल्या घनवट ऑर्थोकेअर ॲक्सिडेंट ॲण्ड मल्टी स्पेशालिस्ट हॉस्पिटलच्या लोकार्पणानिमित्त आज श्री क्षेत्र तारकेश्वर गड (महिंदा) येथील महंत ह.भ.प. आदिनाथ महाराज शास्त्री यांनी रुग्णालयास सदिच्छा भेट दिली. यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना महाराज म्हणाले, मनुष्य आजारी पडला की त्याला स्वतःच्या नातेवाईकांपेक्षा डॉक्टरांवर अधिक विश्वास वाटतो. रुग्णाच्या वेदनेतून त्याला बाहेर काढण्याचे मोठे कार्य डॉक्टर करत असतात. त्यामुळे डॉक्टर हा केवळ व्यवसाय नसून तो एक सेवाधर्म आहे. कार्यक्रमात महंत आदिनाथ महाराज शास्त्री यांचा पुष्पहार, शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. रुग्णालयाचे संचालक डॉ. विक्रांत घनवट यांनी यावेळी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, गोरगरीब रुग्णांना दर्जेदार उपचार देणे ही आमची प्राथमिकता राहील. गरजू रुग्णांना जरूर पाठवा, त्यांच्या सेवेसाठी आम्ही सदैव तत्पर आहोत. यावेळी महाराजांनी डॉ. विक्रांत घनवट व सौ. प्रिती घनवट दाम्पत्यास आशीर्वाद दिले. कार्यक्रमास रुग्णालयातील डॉक्टर व कर्मचारी उपस्थित होते. नव्याने सुसज्ज अशा या रुग्णालयामुळे शेवगाव शहर व परिसरातील नागरिकांना आधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध होणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# आ. रोहित पवार यांना सुरक्षा द्या

## दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रांताधिकाऱ्यांना निवेदन



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कर्जत** : आ. रोहित पवार राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताविषयी वारंवार प्रश्न उपस्थित करून केंद्र यासह राज्य सरकारचे लक्ष वेधत आहे. त्यामुळे त्यांच्या जीवितास सुद्धा धोका उदभवू शकतो अशी भावना सर्वसामान्य कार्यकर्त्यांमध्ये निर्माण होत असून त्याच्या सुरक्षिततेसाठी त्यांना सरकारने झेड प्लस सुरक्षा द्यावी अशी विनंती दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी निवेदनाद्वारे केली आहे. सोमवारी या आशयाचे निवेदन प्रांताधिकारी नितीन पाटील यांना देण्यात आले. महाराष्ट्र राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारी रोजी बारामती विमान अपघातात निधन झाले. या विमान दुर्घटनेच्या अपघाती मृत्यूची सखोल व निष्पक्ष चौकशी होत सत्य जनतेसमोर यावे अशी राज्यातील जनतेची व सर्वसामान्य कार्यकर्त्यांची तीव्र भावना आहे.

संबंधित विमान दुर्घटना ही केवळ अपघात होता की ? घातपात याचा सखोल उलगडा व्हावा यासाठी आमदार रोहित पवार मागील पंधरा दिवसांपासून स्वताच्या जीवाची पर्वा न करता पत्रकार परिषदेद्वारे आपली भूमिका प्रसार माध्यमे यासह सर्वसामान्य जनतेच्या समोर सातत्याने आणि निर्भीडपणे मांडत आहे. त्यांच्या या ठाम भूमिकेमुळे त्यांच्या जीवितास संभाव्य धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. राज्यातील सध्याच्या संवेदनशील परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने तातडीने सराकरने त्यांना झेड प्लस दर्जाची सुरक्षा प्रदान करण्यात यावी अशी मागणी जेष्ठनेते बाळासाहेब साळुंके, माजी नगराध्यक्ष नामदेव राऊत, युवकचे विशाल मेहेत्रे, रघुआबा काळदाते, नामदेव थोरात, राजेंद्र देशमुख, पूजा सुर्यवंशी, अड बाळासाहेब शिंदे, गुलाब तनपुरे आदींनी सोमवारी प्रांताधिकारी नितीन पाटील यांना निवेदनाद्वारे केली आहे.

# प्रशासनाची चाणाक्ष मध्यस्थी ठरली यशस्वी

## जवखेडमध्ये सामाजिक सलोख्याचा विजय


प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी** : तालुक्यातील जवखेड येथे श्री कानोबा देवस्थान (दर्गाह) संदर्भात अनेक वर्षांपासून सुरू असलेला वाद अखेर प्रशासनाच्या प्रभावी मध्यस्थीमुळे आणि दोन्ही समाजाच्या परस्पर सामंजस्याने कायमचा निकाली निघाला आहे. दीर्घकाळ सामाजिक शांततेसाठी आव्हान ठरत असलेल्या या प्रकरणावर ऐतिहासिक तोडगा निघाल्याने गावात ऐक्य आणि समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, जवखेडमध्ये सामाजिक सलोख्याची नवी पहाट उगवली आहे. उपविभागीय अधिकारी (प्रांत) प्रसाद मते, तहसीलदार उद्धव नाईक, उपविभागीय पोलीस अधिकारी (डीवायएसपी) नीरज राजगुरू तसेच पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आलेल्या महत्त्वपूर्ण शांतता बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. प्रशासनाने दोन्ही समाजातील प्रतिनिधींना विश्वासात घेत संयमाने संवाद साधला आणि कायदेशीर चौकटीत राहून सामंजस्याचा मार्ग शोधला.

या प्रक्रियेत दोन्ही समाजाच्या जबाबदार नागरिकांनीही सकारात्मक भूमिका घेत सहकार्य केल्याने अखेर वर्षानुवर्षे सुरू असलेला वाद संपुष्टात आला. बैठकीत देवस्थानाबाबत स्पष्ट नियमावली निश्चित करण्यात आली. त्यानुसार, कानोबा देवस्थान परिसराची स्वच्छता दोन्ही समाजाने एकत्रितपणे करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र देवस्थानाच्या मूळ इमारतीच्या रचनेत कोणत्याही प्रकारची छेडछाड किंवा बदल करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. वास्तूचे ऐतिहासिक स्वरूप अबाधित राहावे यासाठी इमारतीच्या आत किंवा बाहेर रंगकाम करणे, चुना लावणे अथवा कोणत्याही प्रकारचे बांधकामात्मक बदल करण्यास प्रशासनाने स्पष्ट बंदी घातली आहे. धार्मिक विधींबाबत प्रशासनाने सुवर्णमध्य साधत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. दोन्ही समाजाने आपापल्या धार्मिक परंपरेनुसार स्वतंत्रपणे फक्त समाधीस्थळी पूजन व विधी पार पाडावेत, असे ठरविण्यात आले आहे. यामुळे धार्मिक भावना जपल्या जात असतानाच संभाव्य वादाला आळा बसणार आहे. तसेच भविष्यात धार्मिक मिरवणुका काढताना दोन्ही समाज आपल्या स्वतंत्र ध्वजांसह मिरवणुका काढतील आणि सर्व कार्यक्रम शांततेत व कायदा सुव्यवस्था राखून पार पाडतील, असा निर्धार ग्रामस्थांनी व्यक्त केला.

प्रशासनाच्या आदेशांचे काटेकोर पालन करण्याचे आश्वासनही दोन्ही बाजूंनी देण्यात आले आहे. दीर्घकाळ प्रलंबित असलेला संवेदनशील प्रश्न शांततेच्या मार्गाने निकाली निघाल्यामुळे महसूल व पोलीस प्रशासनाच्या कार्यक्षमतेचे सर्वत्र कौतुक होत आहे. गावातील नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि भाविकांनी प्रशासनाचे विशेष आभार मानत हा निर्णय सामाजिक ऐक्याचा आदर्श ठरेल, असा विश्वास व्यक्त केला आहे. जवखेडमध्ये आता तणावाऐवजी शांतता, उत्साह आणि परस्पर विश्वासाचे वातावरण निर्माण झाले असून, हा तोडगा तालुक्यात सामाजिक सलोख्याचा नवा आदर्श ठरणार असल्याची भावना व्यक्त होत आहे.

# संदीप कराड यांना आदर्श गटविकास अधिकारी पुरस्कार



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**ढोरजळगाव** : येथील रहिवासी आणि सध्या रायगड जिल्ह्यातील खालापूर पंचायत समितीमध्ये गटविकास अधिकारी म्हणून कार्यरत असलेले संदीप सुखदेव कराड यांना महाराष्ट्र राज्य पर्यावरण विभागातर्फे राबविण्यात येणाऱ्या माझी वसुंधरा मोहिमेतील उत्कृष्ट कामगिरीबद्दल पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते आदर्श गटविकास अधिकारी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य पर्यावरण विभागातर्फे राबविण्यात येणाऱ्या माझी वसुंधरा ५.० मोहिमेचे मुख्य उद्दिष्ट पर्यावरणाचे रक्षण, संवर्धन आणि संवर्धन, जैवविविधतेचे रक्षण, पाणी आणि वीज वाचवणे, प्लास्टिकचा वापर टाळणे आणि ग्रामीण भागात घनकचरा आणि पाण्याचे व्यवस्थापन करणे आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये १ जून ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत ही मोहीम राबविण्यात आली.

रायगड जिल्ह्यातील खालापूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संदीप कराड यांच्या मार्गदर्शनाखाली खालापूर पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या सर्व ४५ ग्रामपंचायती क्षेत्रभेटीसाठी पात्र ठरल्या आहेत. खालापूर हा राज्यातील एकमेव तालुका बनला जिथे सर्व ग्रामपंचायती पात्र ठरल्या. एका तालुक्यातील सुमारे ८ ग्रामपंचायतींना ५.५० कोटी रुपयांचे पुरस्कार मिळाले, ही कामगिरी विक्रमी ठरली. यापैकी, शिरवली ग्रामपंचायतीने १.५ कोटी किमतीचे दोन पुरस्कार जिंकून राज्यात प्रथम क्रमांक पटकावला. या सर्वोत्तम कामगिरीची दखल घेत, सरकारने त्यांना पर्यावरण मंत्र्यांच्या हस्ते राज्यातील सर्वोत्तम ब्लॉक डेव्हलपमेंट ऑफिसरचा पुरस्कार देऊन सन्मानित केले. यापूर्वी, कराड यांनी त्यांची बदली झालेल्या ठिकाणी कामगिरीत आपला ठसा उमटवला आहे आणि नाशिक जिल्ह्यातील निफाड पंचायत समितीमध्ये काम करताना त्यांनी सामान्य लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी विविध उपाययोजना आणि उपक्रम राबवून एक आदर्श निर्माण केला आहे.

त्यांच्या कामगिरीबद्दल अहिल्यानगर जिल्हा आणि ढोरजळगाव परिसरातून त्यांचे विशेष कौतुक होत आहे.

# मार्कशीटपूर्वीच जॉब ऑफर

## विद्यार्थ्यांची प्लेसमेंटमध्ये चमकदार कामगिरी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : जिल्ह्यातील नामांकित इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेन्ट स्टडीज करिअर डेव्हलपमेंट अँड रिसर्च (आय.एम.एस.) येथील एम.बी.ए. व एम.सी.ए. अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना मार्कशीट मिळण्यापूर्वीच जॉब ऑफर लेटर प्राप्त झाले आहे. प्री-प्लेसमेंट ऑफरच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी यशाची नोंद केली आहे. प्लेसमेंट मिळालेल्या विद्यार्थ्यांमध्ये अनिकेत अमृते, शिवानी टाक (पोलाद स्टील), खुशी अरोरा, पायल आव्हाड, सारा चाबुकस्वार, शोएब शेख, श्रेया कानडे (अहमदनगर मर्चंट बँक), श्रेया सामल व साक्षी बिज्जा (निर्मल बंग सिक्युरिटीज), शुभम पालवे, शुभम कासव, श्रद्धा अकोलकर (ट्रेफिड एआय), तसेच अरहम आयटी सॉफ्टवेअर आदी कंपन्यांमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. संस्थेची गुणवत्ता, तज्ज्ञ प्राध्यापक वर्ग आणि 'स्टुडन्ट फर्स्ट' धोरण यामुळे राष्ट्रीय व जागतिक कीर्तीच्या कंपन्यांमध्ये विद्यार्थ्यांची निवड होत असल्याचे प्लेसमेंट सेलचे प्रा. सुरेश खन्ना यांनी सांगितले. दरम्यान, १० मार्च रोजी टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) कंपनीचा कॅम्पस रिक्रुटमेंट ड्राइव्ह आयोजित करण्यात आला असून एमबीएसाठी ६ लाख तर एमसीएसाठी ११.८ लाखांचे पॅकेज जाहीर करण्यात आले आहे. संस्थेचे डायरेक्टर डॉ. एम. बी. मेहता, डेप्युटी डायरेक्टर डॉ. विक्रम बार्नबस, एमबीए विभागप्रमुख डॉ. प्रणोती तेलोरे व एमसीए विभागप्रमुख डॉ. महेश पोतदार यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# लुटारूंचा मुखवटा फाटला!

## वृत्तपत्राच्या धडाकेबाज पाठपुराव्याने ६ हजारांची उकळी परत; पण उरलेला हिशोब कधी?

प्रतिनिधी । दादा सोनवणे

**श्रीगोंदा** : तालुक्यात दिव्यांगांच्या भावनांवर डल्ला मारत म्हाडाच्या घराचे आमिष दाखवून प्रत्येकी ६ हजार रुपये उकळणाऱ्याचा अखेर मुखवटा फाटला. वृत्तपत्राने सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे अखेर त्या दलालाने अनेक दिव्यांग व्यक्तीला घरासाठी घेतलेली रक्कम संबंधित व्यक्तीला घेतलेली रक्कम अनेकांना परत करावी लागली! त्यामुळे आता घराची रक्कम परत मिळाली मात्र इतर फसवणुकीचे काय असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

तालुक्यातील एक दिव्यांग व्यक्ती गरीब घरात जन्माला येते त्यानंतर मात्र ते दिव्यांग नागरिकांचे नेतृत्व करण्यासाठी समोर आले. त्यांनी एक अपंग संघटना स्थापन केली त्यातून अनेक दिव्यांग व्यक्तींना त्याचा फायदा होईल असे सर्वांना वाटले सर्वांना वाटले ही तर सुरुवात आहे पण हा शेवट नाहीमात्र याचे सर्व उलटेच झालं प्रथम दिव्यांग व्यक्तीला घर देतो म्हणत त्याच्या खिशात हात घातला !आणि प्रत्येक दिव्यांग व्यक्तीला सरकारी कोट्यातून म्हाडाची घरे मिळणार त्यासाठी ६ हजार रुपये भरावे लागतील असे म्हणत तालुक्यातील दिव्यांग नागरिकांकडून लाखो रुपयाची मोहमाया गोळा केली मात्र तब्बल ५ ते ७ वर्ष उलटले तरीही घराचा पत्ता नाही हे लक्षात आल्यावर त्यांनी पैश्याची मागणी केली असता उडवाउडवीची उत्तरे देऊ लागले मात्र वृत्तपत्राच्या दणक्याने अनेक दिव्यांग बांधवाना त्याने घरोघरी जाऊन पैशे केले आहेत.

त्यामुळे दिव्यांग बांधवांच्या चेहऱ्यावर आनंद पाहण्यास मिळाला यांच्याकडून घर, दिव्यांग साहित्य, लोन, झेरॉक्स मशीन अशी आश्वासनांची सरबत्ती. मात्र प्रत्यक्षात मात्र गरीब, गरजू दिव्यांगांच्या खिशावर डाका. इतकेच नव्हे तर बनावट दिव्यांग प्रमाणपत्र मिळवून देण्याच्या नावाखाली पैशांची वसुली केल्याचा गंभीर आरोप होताना दिसत आहे आता हि समाजसेवा की सरळसरळ शोषण? म्हणायचे असा प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे.

### पैसे परत पण सगळ्यांचे का?

वृत्तपत्रात बातमी झळकताच संबंधित व्यक्तीची धावपळ सुरू. काहींना ६ हजार परत मिळाले त्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलले. पण प्रश्न अजून जिवंत आहेत. दिव्यांग साहित्याच्या नावाने घेतलेले पैसे कुठे? लोन प्रक्रियेच्या नावाने उकळलेली रक्कम परत कधी? बनावट प्रमाणपत्रासाठी घेतलेले पैसे कोण देणार? थोडे परत केले म्हणजे पाप धुतले जाते का? हा प्रश्न फक्त पैशांचा नाही हा प्रश्न विश्वासाचा आहे. असा संतप्त सवाल दिव्यांग बांधव करत आहेत.

### चौथा स्तंभ जागा झाला म्हणून न्यायाचा किरण : दिव्यांग बांधव

जर वृत्तपत्राने आवाज उठवला नसता, तर हे पैसे परत मिळाले नसते मात्र चौथा स्तंभ जागा जाला आणि दिव्यांग बांधवाच्या आशेच किरण बनला असून दिव्यांगांच्या डोळ्यातील अश्रू पुसण्याचे काम माध्यमांनी केले. पण लढाई अजून बाकी आहे. जोपर्यंत शेवटच्या व्यक्तीला शेवटचा रुपया परत मिळत नाही तोपर्यंत हा पाठपुरावा करावा अशी विनंती दिव्यांग बांधवानी केली आहे.

# जनता सहकार अर्बन शाखेचा वर्धापन दिन साजरा




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**ढोरजळगांव** : विश्वसनीय आणि जलद सेवेची परंपरा कायम राखत, सभासदांच्या इच्छा पूर्ण करण्यास जनता सहकार अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड, आव्हाने बुश्रश्र शाखा यशस्वी ठरली.यामुळेच शाखेच्या वर्धापन दिनाला सभासद, ठेवीदार, खातेदार, शेतकरी, महिला, पत्रकार, व्यापारी, व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी आयोजित संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त ० ते ५ वयोगटातील बाल आधार कार्ड मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

या मेळाव्यास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून एकूण ७३ लहान मुलांची आधार कार्ड नोंदणी यशस्वीरीत्या करण्यात आली.या उपक्रमासाठी भारतीय डाक विभाग, शेवगाव यांच्या वतीने मोलाचे सहकार्य लाभले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष- संदीप देवढे, संचालक- ऋषिकेश फटांगरे, मुख्य कार्यकारी अधिकारी- अमोल डुरे, विभागीय व्यवस्थापक- हरी दिवटे, मुख्य कार्यालय कर्ज अधिकारी- सुरज मस्के, आव्हाने बुश्रश्र शाखेचे शाखा व्यवस्थापक- महेश भालेराव, कॅशियर- महादेव पंडित तसेच कर्ज अधिकारी- विकास डूरे हे उपस्थित होते.

# तळेगाव ढमढेरे येथील महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण



गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करताना प्रसिद्ध साहित्यिक डॉ. संजय कळमकर व इतर मान्यवर. (छायाचित्र आकाश भोरडे)

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**तळेगाव ढमढेरे :** येथील शिक्षण प्रसारक मंडळाच्या साहेबराव शंकरराव ढमढेरे कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ नुकताच संपन्न झाला. यावेळी शैक्षणिक वर्षात वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थी विद्यार्थिनींचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

यावेळी आपल्या देशातील प्रत्येक युवक सर्वार्थाने सक्षम आहे. या युवाशक्तीची ऊर्जा सकारात्मक कार्यासाठी वापरणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध साहित्यिक व व्याख्याते डॉ. संजय कळमकर यांनी केले. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. कळमकर बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्या सहकारी बँकेचे संचालक महेश ढमढेरे हे होते.

यावेळी शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष श्रीकांत सातपुते, जेष्ठ संचालक विजय ढमढेरे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अर्जुन मुसमाडे, विद्यार्थी विकास मंडळाचे अधिकारी डॉ. रवींद्र भगत आदी उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे भूगोल अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. अर्जुन मुसमाडे यांनी प्रास्ताविक केले. मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ. संदीप सांगळे यांनी वार्षिक अहवाल सादर केला. प्रा. शाकूराव कोरडे यांनी सूत्रसंचालन तर डॉ. रवींद्र भगत यांनी आभार मानले.

# पुणे येथील मुख्यालयावर शेती महामंडळ कामगारांचा मोर्चा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव :** महाराष्ट्रसरकारने एमआयडीसी साठी महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची अंदाजे २५००एकर जमीन विनामूल्य दिली आहे तसेच ग्रामपंचायतीला पाचशे एकर जमीन विनामूल्य दिली आहे.परंतु कामगारांना रामराजे निंबाळकर कमिटीच्या शिफारशी प्रमाणे दोन गुंठे जागा देऊन घर बांधून देण्याचे आश्वासन उच्च न्यायालयाने देऊनही घरे बांधून देत नाही या अन्यायाविरुद्ध व कामगार प्रलंबित मागण्यासाठी येत्या १७ मार्च रोजी शेती महामंडळाच्या पुणे येथील मुख्यालयावर राज्यातील १४ मळ्यावरील कामगारांचा मोर्चा नेण्यात येणार आहे.असा वालचंदनगर रत्नपुरी येथे पाच मळ्यावरील कामगारांच्या मेळावा प्रसंगी इशारा कामगार नेते सुभाष कुलकर्णी यांनी दिला आहे. प्रास्तविक साखरवाडी फलटण येथील बनकर यांनी केले.

सुभाष कुलकर्णी यांनी कामगारांना दोन गुंठे जागा देऊन प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत घरे देण्याची मागणी केली. तसेच चौथा, पाचवा व सहावा वेतन आयोगाचा फरक देणे, न्यायालयीन निर्णयानुसार समान कामास समान वेतन लागू करणे, औद्योगिक न्यायालय अहिल्यानगरच्या आदेशानुसार २०१८ मध्ये हजेरीपटावर असलेल्या रोजंदार कामगारांना



१५ दिवसांची नुकसानभरपाई व तीन महिन्यांचा जादा पगार देणे, तसेच सेवानिवृत्त रोजंदारांना ग्रॅच्युइटी अदा करण्याची मागणी करण्यात आली. थकीत देणी तातडीने द्यावीत, अशीही मागणी यावेळी करण्यात आली. मेळाव्यात पेन्शनर संघटनेचे पुणे जिल्हा प्रमुख सागर मिसाळ व त्यांच्या पत्नी निर्मलाताई मिसाळ यांचा जिल्हा परिषद सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. सागर मिसाळ यांनी पुणे येथे होणाऱ्या मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करत, प्रसंगी आमरण उपोषणाचा इशारा दिला.

## द•ख•ल

### कासारीत दुचाकी घसरून पडल्याने इसमाचा मृत्यू

**तळेगाव ढमढेरे :** कासारी (ता. शिरुर) येथील तळेगाव रस्त्याने जाणाऱ्या इसमांची दुचाकी घसरुन पडल्याने झालेल्या अपघातात एक इसम जखमी तर एकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली असून सोमनाथ श्रीहरी साळुंके असे मृत इसमाचे नाव आहे.कासारी (ता. शिरुर) येथील तळेगाव रस्त्याने समीर पीरजादे व सोमनाथ साळुंके हे दोघे त्यांच्या ताब्यातील एम एच १२ जे ई १६४६ या दुचाकीहून तळेगाव ढमढेरे येथे लग्नासाठी चाललेले होते, सदर रस्त्यावरील वळणावर सोमनाथ हे चालवत असलेली दुचाकी घसरून रस्त्याचे खाली जाऊन झाडावर आदळून अपघात होऊन दुचाकीवरील दोघे जखमी झाले, दरम्यान काही नागरिकांनी दोघांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले मात्र उपचारापूर्वी सोमनाथ श्रीहरी साळुंके (वय ३८ वर्षे सध्या रा. खंडाळा माथा रस्ता रांजणगाव गणपती ता. शिरुर यांचा मृत्यू झाला तर याबाबत समीर शौकत पीरजादे यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली असून पुढील तपास पोलीस हवालदार अमोल चव्हाण हे करत आहे.

### सासवड एस टी आगारात स्मार्ट कार्ड वितरण सुरू

**माळशिरस :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ अर्थात एस टी ने आता सवलत घेणाऱ्या सर्व प्रवाशांसाठी (एन सी एम सी) नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड अनिवार्य केले असुन या स्मार्ट कार्डचे वितरण सासवड येथील एस टी स्थानकात सुरू करण्यात आले असल्याची माहिती स्थानक प्रमुख मोहिनी डेरे यांनी दिली. काही दिवसांपूर्वी या योजनेचा शुभारंभ सासवडच्या नगराध्यक्षा आनंदी काकी जगताप



यांच्या हस्ते करण्यात आला असून सर्व सवलत घेणाऱ्या प्रवाशांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन स्थानक प्रमुखांनी केले आहे. महिला, जेष्ठ नागरिक, दिव्यांग व्यक्ती, विद्यार्थी तसेच अमृत जेष्ठ नागरिक या घटकांना आता स्मार्ट कार्ड गरजेचे असून यापुढे आधार कार्ड दाखवून सवलत मिळणार नाही असे सांगत लाभधारक महिला व ज्येष्ठ नागरिक यांनी आधार कार्ड, दिव्यांग व अंध व्यक्तींनी वैश्विक ओळखपत्र तर विद्यार्थ्यांनी सरल क्रमांक दाखवून स्मार्ट कार्डची नोंदणी करावी. नोंदणीनंतर एक महिन्यांनी स्मार्ट कॉर्ड उपलब्ध होईल असेही डेरे यांनी स्पष्ट केले. आज (सोमवारी) स्थानक प्रमुख मोहिनी डेरे यांनी स्मार्टकार्ड वितरण कक्षात भेट देऊन माहिती घेतली. कार्ड वितरण करणारे सारंग लोणकर, वाहतूक नियंत्रक महेश भोंगळे, सेवानिवृत्त लिपीक प्रकाश मोरे व प्रवाशी बांधव या प्रसंगी उपस्थित होते.

### पुण्यात साखर कारखाने बंद होण्यास सुरुवात

**पुणे :** जिल्ह्यातील साखर कारखान्यांचा गळीत हंगाम अंतिम टप्प्यात पोहोचला असून ऊस उपलब्धतेअभावी कारखाने बंद होण्यास सुरुवात झाली आहे. यंदा हंगामात सुरू झालेल्या १५ साखर कारखान्यांपैकी एका कारखान्याने गळीत थांबविले असून पुढील एक ते दोन महिन्यांत उर्वरित कारखानेही बंद होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. जिल्ह्यात एकूण नऊ सहकारी व सहा खाजगी साखर कारखाने कार्यरत होते. सुमारे साडेतीन महिन्यांपूर्वी गळीत हंगामाला सुरुवात झाली होती. मात्र कार्यक्षेत्रात ऊस क्षेत्र कमी राहणे, पाणीटंचाईची तीव्रता वाढणे आणि ऊस पुरवठ्यात घट होणे या कारणांमुळे कारखान्यांना हंगाम लवकर आटोपावा लागत आहे. ५ फेब्रुवारीपासून काही कारखान्यांनी गळीत बंद करण्यास सुरुवात केली आहे. शिरूर तालुक्यातील जातेगाव येथील व्यंकटेश शुगर कारखान्याचाही यात समावेश आहे. जिल्ह्यात ऊसाचे प्रमाण लक्षात घेता कारखाने उशिरा बंद होतील, असा अंदाज होता; मात्र प्रत्यक्षात ऊस उपलब्धतेअभावी गळीत लवकर थांबू लागले आहे. ऊस तोडणीसाठी गावाकडून आलेले मजूर साधारण पाच ते सहा महिने काम करतात.

# आई-वडिलांचे आशीर्वाद हेच मुलांच्या प्रगतीचे खरे बळ

## ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेत मातृ-पितृ पूजन सोहळा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आळंदी :** आई-वडिलांचे आशीर्वाद हेच मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी खरे प्रेरणास्थान आहे. मुलांची सर्वांगीण प्रगती ही त्यांच्या संस्कारांवर अवलंबून असते. त्यामुळे पालकांनी मुलांशी संवाद साधत त्यांना वेळ देणे अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन नगरसेविका ऋतुजा घुंडरे यांनी केले.

श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्था संचलित श्री ज्ञानेश्वर प्राथमिक विद्यामंदिर व श्री ज्ञानेश्वर बामलक मंदिर प्रशालेत मातृ-पितृ पूजनाचा संस्कारक्षम सोहळा उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षा ह.भ.प. भाग्यश्री भाग्यवंत होत्या. यावेळी नगरसेविका ऋतुजा घुंडरे, नगरसेवक सुरेश झोंबाडे, माजी विद्यार्थी व रोबोटिक्स अभियंता नितीश साळुंखे व परिवार, संस्थेचे सचिव अजित वडगावकर उपस्थित होते. मुख्याध्यापक प्रदीप काळे यांनी प्रास्ताविकात शालेय शिक्षणाबरोबरच संस्कारक्षम उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थिनी ईश्वरी ढगे हिने मातृ-पितृ पूजन हा कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस असल्याचे सांगितले. नगरसेविका ऋतुजा घुंडरे म्हणाल्या, आई-वडिलांचे आशीर्वाद हेच मुलांच्या आयुष्याचा आधारस्तंभ असतात. पालकांनी मुलांशी विविध विषयांवर चर्चा करावी, त्यांना धार्मिक व ऐतिहासिक स्थळांना घेऊन जावे आणि एकत्र वेळ घालवावा. संस्कार आणि संवाद यामुळेच मुलांमध्ये



जबाबदारीची जाणीव निर्माण होते. नगरसेवक सुरेश झोंबाडे यांनी आईच्या सेवेसाठी सरकारी नोकरी सोडल्याचा अनुभव सांगत पालकसेवेचे महत्त्व पटवून दिले. संस्कार, कृतज्ञता आणि प्रेमाचा संगम घडविणारा मातृ-पितृ पूजन सोहळा उपस्थितांच्या मनात दीर्घकाळ स्मरणात राहील, अशी भावना संस्था सचिव अजित वडगावकर यांनी व्यक्त केली. विद्यार्थ्यांनी आई-वडिलांना कुमकुम तिलक करून हार अर्पण केला, त्यांच्या पायांवर मस्तक ठेवून सेवा करण्याचा संकल्प केला. पालकांनीही मुलांना आशीर्वाद देत भावनिक क्षण अनुभवले. सूत्रसंचालन राहुल चव्हाण व आरती गावडे यांनी केले. वैशाली शेळके यांनी आभार मानले.

# पर्यावरण विषयक तत्त्वज्ञान सांगणाऱ्या निसर्ग दाता पुस्तकास ग्रंथ पुरस्कार प्रदान

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**निरगुडसर :** निरगुडसर गावचे पोलीस पाटील, पर्यावरण अभ्यासक, स्तंभलेखक विठ्ठल वळसे पाटील लिखीत ''निसर्ग दाता'' या वैचारिक ग्रंथास पुणे येथे राज्यस्तरीय शासकीय मराठी साहित्य संमेलन - २०२६ संपन्न झालेल्या साहित्य संमेलनात मान्यवरांच्या हस्ते ग्रंथ पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले.

नुकतेच पुणे येथील बालगंधर्व रंगमंदिर येथे पुणे महानगरपालिका, मराठी भाषा संवर्धन समिती, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधनी (यशदा) व संवाद यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवशीय राज्यस्तरीय शासकीय मराठी साहित्य संमेलन - २०२६ पार पडले. या संमेलनात विविध लेखकांना पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले.

''ग्रंथ पुरस्कार'' महेश भागवत अतिरिक्त महासंचालक कायदा सुव्यवस्था तेलंगणा, सचिन इटकर क्षेत्रीय संचालक महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ, शेखर गायकवाड अतिरिक्त महासंचालक, डॉ. किरण धांडे यशदा प्रभारी अधिकारी, सुनील महाजन संवाद पुणे संचालक, व्यंकटेश कल्याणकर माध्यम व प्रकाशन विभाग यशदा या मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तिपत्रक, स्मृतीचिन्ह देवून गौरविण्यात आले.

निसर्ग दाता या पुस्तकाला विविध साहित्य संस्थांनी गौरविले आहे. या ग्रंथात पर्यावरण विषयक वैचारिक तत्वज्ञान मांडले आहे.




# आंबेगाव तालुका पत्रकार संघाला आदर्श पत्रकार संघ पुरस्कार प्रदान

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**निरगुडसर :** आंबेगाव तालुका पत्रकार संघाला स्वर्गीय वसंतराव काणे आदर्श पत्रकार संघ पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते कर्जत ता.रायगड येथे प्रदान करण्यात आला.

खासदार श्रीरंग बारणे यांच्या उपस्थितीत जेष्ठ पत्रकार हेमंत देसाई,आखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख,शरदराव पाबळे ,सुनील लोणकर यांच्या




हस्ते पुरस्काराचे वितरण करण्यात आले.आखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने देण्यात येणारा वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ पुरस्कार यंदा पुणे विभागाच्या साठ तालुक्यातून एकमेव आंबेगाव तालुका पत्रकार संघाला प्रदान करण्यात आला. जेष्ठ पत्रकार हेमंत देसाई, मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांच्या हस्ते तालुका पत्रकार संघाचे संस्थापक डी.के.वळसे पाटील, अध्यक्ष संतोष वळसे पाटील व डिजिटल मिडियाचे अध्यक्ष सचिन तोडकर यांनी हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी तालुका पत्रकार संघाचे पदाधिकारी उपस्थित होते.

छायाचित्र मजकूर : आंबेगाव तालुका पत्रकार संघाला वसंतराव काणे आदर्श पत्रकार संघ पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते कर्जत येथे प्रदान करताना मान्यवर.

# माजी कृषी विद्यार्थी ५६ वर्षांनंतर आले एकत्र

## कृषी महाविद्यालयात माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन उत्साहात साजरे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** पुणे कृषी महाविद्यालयातून १९७० साली पदवीधर झालेल्या माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन महाविद्यालयातील उद्यानविद्या विभागाच्या चीमा सभागृहात उत्साहात रविवार (ता. २२) पार पडले. गेल्या ५६ वर्षांनंतर महाराष्ट्रातील सर्व भागातून माजी विद्यार्थी आपल्या पत्नीसह स्नेहसंमेलन सहभागी झाले होते. माजी विद्यार्थी संमेलनाचे उद्घाटन पुणे कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. महानंद माने यांनी केले. यावेळी महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. रामचंद्र साबळे, चंद्रकांत गायकवाड, डी.एन. सरोदे, सुरेश डेरे आदि उपस्थित होते. माजी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातून मिळालेल्या ज्ञानाच्या शिदोरीवर शिक्षण, संशोधन, क्रिडा, प्रशासन, वित्त, शेती, नर्सरी, पर्यटन अशा विविध क्षेत्रात उत्तुंग शिखरे पादाक्रांत केली आहे. विशेषतः बँकाच्या राष्ट्रीय करणानंतर कृषी पतपुरवठा क्षेत्रात या बॅचचा महत्वाचे योगदान आहे. यावेळी तुकाराम बनकर, उत्तमराव मोरे, बी.

> ऋ महाविद्यालयात काही अडचणी येत असल्या तरी बहुतांश कामे विद्यार्थ्यांच्या सहभागातून यशस्वीपणे पूर्ण होत आहेत. विद्यार्थ्यांना स्वावलंबी करण्यासाठी विविध उपक्रम राबवले जात असून त्याला चांगला प्रतिसाद मिळाला आहे; हे उपक्रम विद्यापीठ स्तरावरही राबविण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच प्रशासकीय विभागातील कृषी पदवीधरांनी प्रामाणिकपणे कार्य करणे अपेक्षित आहे.
>
> **महानंद माने, सहयोगी अधिष्ठाता, पुणे कृषी महाविद्यालय, पुणे**

बी यादव, जयंत कुलकर्णी, सुभाष पाटणे, दशरथ शेवाळे, शिवाजीराव भोईटे, नारायण कुलकर्णी, दिलीप साळुंखे, अमृत साळुंखे, मेघश्याम घोलप, अनंत डुंबरे, पोपट पठारे अशा विविध पदवीधरांनी सहभागी होऊन महाविद्यालयातील स्मृतींना उजाळा दिला. संमेलनात आप्पासाहेब यादव यांनी सुत्रसंचालन केले. तर ज्ञानदेव सरोदे यांनी आभार मानले.



**पुणे :** पुणे कृषी महाविद्यालयातून १९७० साली पदवीधर झालेल्या माजी विद्यार्थी गेल्या ५६ वर्षांनंतर महाराष्ट्रातील सर्व भागातून माजी विद्यार्थी स्नेहसंमेलन संमेलनात रविवारी (ता. २२) सहभागी झाले होते.

# वेळेत गुंतवणूक केल्यास मोठी स्वप्ने साकार : पवन चरेजा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिरूर :** सनशाईन सॅटर्डे क्लब यांच्या वतीने 'आर्थिक नियोजन व गुंतवणुकीचे पर्याय' या विषयावर व्याख्यानाचे मंगळवार ( ता. २३) आयोजन करण्यात आले. यावेळी कंपनी सेक्रेटरी पवन चरेजा यांनी मार्गदर्शन करताना वेळेत सुरू केलेली छोटी गुंतवणूक भविष्यात मोठी स्वप्ने पूर्ण करू शकते, असे सांगितले.

गुंतवणूक करताना स्वतःची आर्थिक क्षमता, उद्दिष्टे आणि जोखीम स्वीकारण्याची तयारी लक्षात घेणे आवश्यक आहे. सर्व रक्कम एका पर्यायात न गुंतवता विविध साधनांमध्ये समतोल राखल्यास जोखीम कमी होते, असे त्यांनी स्पष्ट केले. महागाई दरापेक्षा अधिक परतावा देणाऱ्या पर्यायांची निवड करणे गरजेचे असून गुंतवणूक दीर्घकालीन दृष्टीकोनातून, संयम आणि सातत्य ठेवून करावी, असे त्यांनी नमूद केले.




मुदत ठेवी, शेअर्स, सोने, कर्जरोखे, मालमत्ता, म्युच्युअल फंड आदी गुंतवणुकीचे पर्याय उपलब्ध असून प्रत्येकाचा परतावा व जोखीम वेगळी असते. योग्य आर्थिक नियोजन, वैयक्तिक व कौटुंबिक आर्थिक व्यवस्थापन आणि शाश्वत संपत्ती निर्मितीवर त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. आरोग्य विमा हा खर्च नसून भविष्यातील आर्थिक सुरक्षिततेची हमी असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

ार्यक्रमास महाराष्ट्र लोकसेवा आयोग चे माजी अध्यक्ष तथा क्लब अध्यक्ष किशोरराजे निंबाळकर, माजी मुख्य अभियंता ज्ञानेश्वर जामदार, पोलीस निरीक्षक संदेश केंजळे, नगरसेविका पूजा पोटावळे, प्रा. चैतन्य वाघ, माजी ग्रंथपाल राजा वाघ आदी उपस्थित होते.

िवेळी एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण होऊन कृषी अधिकारी झालेल्या अपूर्वा ज्ञानदेव चव्हाण यांचा सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक निंबाळकर यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. सतीश धुमाळ यांनी केले तर आभार प्रा. चैतन्य वाघ यांनी मानले. कार्यक्रमास क्लब सदस्य व नागरिक उपस्थित होते.

# कान्हूर मेसाईचा प्रशांत रुपनेर दुसऱ्यांदा शिरूर केसरी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पाबळ :** कान्हूर मेसाई (ता. शिरुर) येथील गारकोलवाडीतील प्रशांत संतोष रुपनेर याने दुसऱ्यांदा शिरूर केसरी २०२६ हा किताब मिळवला आहे. कारेगाव येथे झालेल्या शिरूर केसरी मध्ये ६८ किलो वजन गटात कान्हूरच्या प्रशांत रुपनेर यांनी बाजी मारली.

गारकोलवाडी ही कान्हूर मेसाई गावच्या डोंगराळ भागात असलेली छोटीशी वाडी. धनगर

> कान्हूर मेसाई येथील गारकोलवाडी मधील गरीब कुटूंबातील प्रशांत रुपनेर याने शिरूर केसरी होण्याचा मान मिळवला आहे. कान्हूर मेसाई व पंचक्रोशीतील सर्वांना त्याचा अभिमान असून त्याने असेच कुस्ती क्षेत्रात गावाचे नाव मोठे करावे.
>
> **– बबन शिंदे, जिल्हा सरचिटणीस, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी**

समाज बहुसंख्येने असलेल्या या वाडीतील सर्वांची परिस्थिती जेमतेम, मात्र अलीकडील काळात या वाडीने शैक्षणिक गुणवत्तेत मोठी आघाडी घेतली असून दहावी व बारावीच्या वर्गात या वाडीतील मुले अनेकदा प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली आहेत. सध्या पोलीस



भरती सह इतर स्पर्धा परीक्षांचा अभ्यास येथील तरुण पिढी करत आहे. एकेकाळी पूर्ण दुर्लक्षित असणारी ही वाडी आता नवी ओळख निर्माण करत असून प्रशांत संतोष रुपनेर हा मल्ल कुस्तीक्षेत्रात लक्ष वेधून घेत आहे. प्रशांत रुपनेर कर्मयोगी तालीम केंद्र पारगाव येथे रवी बोत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करत आहे.

कान्हूर मेसाई येथे झालेल्या तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत प्रशांत प्रथम आला होता. नुकतेच कारेगाव येथे पार पडलेल्या कुस्ती स्पर्धेत प्रशांतने एकतर्फी बाजी मारत ६८ किलो वजनी गटात प्रथम येण्याचा बहुमान मिळविला असून . यापूर्वी शिरूर केसरी होण्याचा बहुमान प्रशांतने मिळविला असून नुकतेच त्याने दुसऱ्यांदा शिरूर केसरी प्राविण्य मिळवल्याने त्याचे परिसरातून कौतुक होत आहे.

# सासवड शहर पत्रकार संघाच्या वतीने नवनियुक्त जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सदस्यांचा सत्कार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**माळशिरस :** सासवड शहर पत्रकार संघाच्या वतीने नवनियुक्त जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सदस्यांच्या सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. तसेच येत्या ३१ मार्च पर्यंत मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान राबविण्यात येत असून स्थानिक स्वराज्य संस्थांची कार्यक्षमता वाढवण्यासाठी तसेच पायाभूत सुविधामध्ये सुधारणा होण्यासाठी नव्याने निवडून आलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सदस्यांनी सहभाग नोंदवत अभियान यशस्वी करावे असे आवाहन पुरंदर पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी प्रणोती श्री श्रीमाळ यांनी केले आहे.

सासवड शहर पत्रकार संघाच्या वतीने नवनियुक्त जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सदस्यांच्या सत्कार समारंभात प्रमुख




अतिथी म्हणून त्या बोलत होत्या. जिल्हा परिषद सदस्य प्राजक्ता दुर्गाडे, रुपाली झेंडे, हरिभाऊ लोळे व अजय इंगळे तसेच अमित झेंडे, माणिक निंबाळकर, अर्चना कटके, माऊली यादव, सायली शिंदे, स्मिता निगडे, मोनिका कांबळे या पंचायत समितीच्या सदस्यांचा शाल , गुलाबपुष्प व संत सोपानदेव यांची प्रतिमा देऊन पत्रकार बंधूंनी सत्कार केला. उपस्थित सर्व सदस्यांनी आपल्या मनोगतात पक्ष, गटतट बाजूला ठेवून पुरंदरच्या सर्वांगीण विकासासाठी एकत्र काम करू अशी भावना व्यक्त केली.

पत्रकारांनी चुकीच्या बाबी लक्षात आणाव्यात व चांगल्या गोष्टींना प्रसिध्दी द्यावी असेही आवाहन सर्वांनी केले. ग्रामसेवक संघटनेचे अध्यक्ष रोहित अभंग यांनीही यावेळी कार्यक्रमास मनोगत मांडून शुभेच्छा दिल्या. पत्रकार संभाजी महामुनी यांनी प्रस्ताविक तर सुधीर गुरव यांनी आभार मानले. संघाचे अध्यक्ष हेमंत ताकवले यांनी सूत्र संचालन केले. कार्यक्रमास शशांक सावंत, संतोष निगडे , डॉ मनोज शिंदे व अन्य मान्यवर उपस्थित होते.गणेश मुळीक, जीवन कड, बाळासाहेब कुलकर्णी, राजेंद्र बर्गे, जगदीश शिंदे, संदीप जगताप, सुनील वढणे या पत्रकार संघाच्या सदस्यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले

# पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रामार्फत मुगुटराव साहेबराव काकडे महाविद्यालय, कला, वाणिज्य व विज्ञान सोमेश्वर नगर-वाघाळवाडी बारामती येथे २७ फेब्रुवारी २०२६ रोजी येथे सकाळी १० वाजता पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यामध्ये जिल्हयातील औद्योगिक परिसरातील ३७ नामांकित उद्योजकांनी त्यांच्या सहभाग दर्शविलेला असून, त्यांच्याकडून ३ हजार ३५ रिक्तपदे भरण्यात येणार आहे. ही सर्व रिक्तपदे किमान १०वी, १२ वी पदवीधर, पदविका अशा विविध पात्रताधारक उमेदवारांसाठी असून बारामती तालुक्यातील अधिकाधिक नोकरी इच्छुक व बेरोजगार उमेदवारांना या रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून नोकरीच्या विविध संधी उपलब्ध करून देण्यात येत आहेत. इच्छुक उमेदवारांनी रिक्तपदांबाबत अधिक माहितीसाठी करुन घेण्यासोबतच अर्ज करण्याकरिता ु.ॲक्षसरअॅ.ारहरिुरूरा.सीं.ळप या संकेतस्थळाला भेट द्यावी. खाजगी क्षेत्रातील विविध रिक्तपदांच्या प्रत्यक्ष मुलाखतीसाठी अधिकाधिक नोकरीइच्छूक रोजगार मेळाव्याच्या ठिकाणी उपस्थित राहून, आपला सहभाग नोंदवावा व या सुवर्णसंधीचा अवश्य लाभ घ्यावा. मुलाखतीस येताना उमेदवारांनी सोबत आपल्या सर्व शैक्षणिक कागदपत्राच्या छायांकित प्रती, आवश्यकतेनुसार अर्जाच्या प्रती सोबत आणाव्यात, अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता गार्गदर्शन केंद्र पुणे, ४८१ रास्ता पेठ, सरदार मुदलीयार रोड, पुणे ४११०११ येथे प्रत्यक्ष संपर्क अथवा ०२०-२६१३३६०६ या दूरध्वनीवर संपर्क साधावा, असे आवाहन सहायक आयुक्त सुरेश वराडे यांनी केले आहे.

## द•ख•ल

### छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त दिव्यांग जोडप्याचा विवाह



**लिंपणगाव :** छत्रपती शिवाजी महाराज जयंतीचे औचित्य साधून श्रीगोंदा तालुक्यातील चिखली येथील साखळी देवी प्रसन्न मंदिरात एका दिव्यांग जोडप्याचा विवाह सोहळा उत्साहात संपन्न झाला.

जाधव परिवारातील कन्या व सोनवणे परिवारातील चिरंजीव हे दोघेही दिव्यांग असून समाजाच्या साक्षीने त्यांच्या नवजीवनाची सुरुवात झाली. आर्थिक व सामाजिक अडचणींवर मात करत हा विवाह पार पाडण्यासाठी श्रीगोंदा येथील चौधरी सेंटरचे मालक चंद्रकांत चौधरी यांनी पुढाकार घेतला. त्यांनी विवाहासाठी आवश्यक साहित्य, नियोजन व आर्थिक जबाबदारी स्वीकारत सामाजिक बांधिलकीचे उदाहरण घालून दिले. मंदिर परिसरात पारंपरिक पद्धतीने विधीवत लग्नसोहळा पार पडला. उपस्थित मान्यवरांनी नवदांपत्यास शुभाशीर्वाद दिले. विविध क्षेत्रांतील मान्यवर, दिव्यांग संघटनेचे पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. समाजातील विविध घटकांनी एकत्र येत उभा केलेला हा आदर्श विवाह सोहळा सामाजिक एकोपा व सहकार्याचा उत्तम नमुना ठरला. दिव्यांगांना संधी व साथ मिळाल्यास तेही स्वाभिमानाने जीवन जगू शकतात, हा संदेश या उपक्रमातून अधोरेखित झाला.

### गाथा पारायण व श्रीमद भागवत कथा सोहळयाची जय्यत तयारी



**नेवासा :** जगदगुरू श्री संत तुकाराम महाराज यांच्या बिजेनिमित्त गाथा पारायण व श्रीमद भागवत कथा सोहळयाची नेवासा येथील संत तुकाराम महाराज मंदिरामध्ये जय्यत तयारी सुरू झाली आहे. गुरुवार दि.२६ फेब्रुवारी ते गुरुवार दि.५ मार्च २०२६ या कालावधीत हा सोहळा होत असल्याची माहिती संत तुकाराम महाराज मंदिर संस्थानचे प्रमुख वाणीभूषण हभप महंत उद्धव महाराज मंडलिक यांनी दिली. यावर्षी होणाऱ्या बिजोत्सव सोहळयात पहाटे ४ ते ५ काकडा, सकाळी ७ ते ११.३० गाथा पारायण,सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ तर सायंकाळी संत श्री तुकाराम महाराज देवस्थानचे विश्वस्त भागवताचार्य हभप अंकुशजी महाराज जगताप यांच्या सुश्राव्य वाणीतून सायंकाळी ७.३० ते रात्री १० यावेळेत संगित श्रीमद भागवत कथा व नंतर भोजनप्रसाद असे कार्यक्रम होणार आहे. यासाठी पंचक्रोशीतील भाविकांनी कथा श्रवणाचा व होणाऱ्या गाथा पारायणाचा लाभ घ्यावा असे आवाहन देवस्थानचे प्रमुख उद्धव महाराज मंडलिक नेवासेकर,विश्वस्त हभप अंकुश महाराज जगताप, श्री संत तुकाराम महाराज मंदिर विश्वस्त मंडळ व समस्त ग्रामस्थ यांनी केले आहे.

### जुनी व नावाजलेली बाजारपेठ काम अंतिम टप्प्यात



**सोनगाव :** सोनगाव सात्रळ येथील जुनी व नावाजलेल्या बाजारपेठेतील विकासकामे अंतिम टप्प्यात आली आहेत. रस्त्यांची दुरुस्ती तसेच मूलभूत सुविधा उभारणीची कामे वेगाने पूर्ण होत असून व्यापारी व नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. लवकरच ही बाजारपेठ नव्या रूपात नागरिकांच्या सेवेत दाखल होणार आहे.

### 'ई-कचरा संकलन अभियाना'चा शुभारंभ उत्साहात



**अहिल्यानगर :** अहिल्यानगर महानगरपालिका, विचार भारती आणि पूर्णम इकोव्हिजन यांच्या संयुक्त विद्यमाने 'ई-कचरा संकलन अभियान'ाचा शुभारंभ संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त उत्साहात पार पडला. अभियानाचा प्रारंभ आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी बोलताना जगताप म्हणाले की, इलेक्ट्रॉनिक वस्तूंचा वाढता वापर लक्षात घेता भविष्यात ई-कचऱ्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आतापासूनच योग्य नियोजन व जनजागृती आवश्यक आहे. संत गाडगेबाबा, स्व. आर.आर. पाटील आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वच्छतेच्या प्रेरणेतून शहर 'ई-कचरा मुक्त' करण्याचा संकल्प असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच फ्लेक्स बोर्डांवर नियंत्रण आणण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली.आयुक्त यशवंत डांगे यांनी शहरात २२ ठिकाणी ई-कचरा संकलन केंद्रे सुरू करण्यात आल्याची माहिती दिली.

विचार भारतीचे ॲड. राजाभाऊ मुळे यांनी पुढील काळात 'डीजे मुक्त' व 'फ्लेक्स बोर्ड मुक्त' अहिल्यानगर घडविण्याचा निर्धार व्यक्त केला. कार्यक्रमास पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दुःखावर मात करू

# २५० एकल महिलांचा स्वावलंबनाचा संकल्प



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** आयुष्यातील वैयक्तिक आघात, सामाजिक दबाव आणि आर्थिक अडचणींना सामोरे जात असलेल्या श्रीगोंदा तालुक्यातील सुमारे २५० एकल महिला एकत्र आल्या आणि आता स्वतःच्या पायावर उभे राहायचे असा निर्धार त्यांनी केला. निमित्त होते साऊ एकल महिला समिती, पंचायत समिती श्रीगोंदा, जगदंब फाउंडेशन व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित उद्योजकता विकास मेळावा व आरोग्य शिबिराचे.

कार्यक्रमात महिलांची आरोग्य तपासणी, रोजगार मार्गदर्शन, आयुष्यमान कार्डसंदर्भात माहिती देण्यात आली. शुगर, रक्तदाब, कर्करोग आदींच्या मोफत तपासण्या करण्यात आल्या. साऊ महिला समितीचे राज्य निमंत्रक हेरंब कुलकर्णी यांनी शेती व बिगरशेती व्यवसायांच्या संधींबाबत मार्गदर्शन करत बचत गटांच्या माध्यमातून उद्योग सुरू करण्याचे आवाहन केले.

पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी राणी फराटे यांनी उमेद अंतर्गत बचत गटात सहभागी होऊन शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा, असे सांगितले. तहसीलदार सचिन डोंगरे यांनी विधवा पेन्शन, संजय गांधी निराधार योजना व रेशन कार्ड नोंदीबाबत प्रशासन तत्पर राहील, असे आश्वासन दिले. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. शैलजा डांगे यांनी महिलांच्या आरोग्य जागरूकतेवर भर दिला.

कार्यक्रमाचे नियोजन डॉ. बाबासाहेब आमटे सामाजिक संस्थेचे विकास पाटील यांच्या पुढाकाराने करण्यात आले. सूत्रसंचालन राहुल साळवे यांनी केले.

चौकट : पोषणाचा संदेश देणारी डाळ किट

कार्यक्रमातील सुमारे २५० महिलांना साऊ एकल महिला समितीतर्फे विविध पोषक डाळींची किट वाटप करण्यात आली. महिलांच्या आहारात डाळींचे कमी प्रमाण असते, याकडे लक्ष वेधण्यासाठी हा प्रतीकात्मक उपक्रम राबविण्यात आला.

उमेदच्या माध्यमातून तालुक्यात जास्तीत जास्त एकल महिलांचे रोजगार सुरू करून त्यांना स्वावलंबी करण्याचा माझा प्रयत्न राहील, असे गटविकास अधिकारी राणी फराटे यांनी सांगितले.

# माझी वसुंधरा अभियानात मिरजगाव ग्रामपंचायतीचा राज्यस्तरीय गौरव

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मिरजगाव :** महाराष्ट्र शासनाच्या माझी वसुंधरा अभियान टप्पा क्र. ४.० अंतर्गत कर्जत तालुक्यातील मिरजगाव ग्रामपंचायतीला राज्यस्तरावर उत्तेजनार्थ प्रथम क्रमांकाचे मानांकन पुरस्कार प्राप्त झाला आहे. सलग तिसऱ्यांदा राज्यात उल्लेखनीय कामगिरी करत मिरजगावने आपला ठसा उमटविला आहे.

दि. १ एप्रिल २०२३ ते ३१ मे २०२४ या कालावधीत राबविण्यात आलेल्या विविध पर्यावरणपूरक उपक्रमांची दखल घेत हा पुरस्कार जाहीर करण्यात आला. पंचतत्त्वांचे संवर्धन, संरक्षण आणि जतन करत शाश्वत विकास साधण्याच्या दृष्टीने ग्राम पंचायतीने प्रभावी अंमलबजावणी केली. दहा हजारांवरील लोकसंख्या गटातील ग्रामपंचायतींमध्ये मिरजगावने उत्कृष्ट कामगिरी बजावत यंदाही मानांकन पटकावले.

मुंबई येथील सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियम येथे आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात हा सन्मान प्रदान करण्यात आला. महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, पर्यावरण



विभागाच्या सचिव जयश्री भोज, सदस्य सचिव देवेंद्र सिंग व अभियानाचे संचालक सुधाकर बोबडे यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला. मिरजगाव ग्रामपंचायतीच्या तत्कालीन सरपंच सुनिता नितीन खेतमाळस, गटविकास अधिकारी अजिंक्य सूर्यवंशी, ग्रामपंचायत सदस्य संगीता कोरडे, ग्राम पंचायत अधिकारी विजयकुमार बनाते, विस्तार अधिकारी निशांत घोडके, दत्तात्रय तुपे आदींनी पुरस्कार स्वीकारला.

यापूर्वी टप्पा १ मध्ये प्रथम तर टप्पा २ मध्ये द्वितीय क्रमांक मिळवत मिरजगावने सातत्य राखले आहे. सलग तिसऱ्यांदा मिळालेल्या या यशामुळे ग्रामपंचायतीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून नागरिकांत आनंदाचे वातावरण आहे. सर्व पदाधिकारी, अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# ग्रामीण मुले आव्हाने पेलून यशस्वी होऊ शकतात : हभप सुदामदेव महाराज



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव :** ग्रामीण भागातील मुलांमध्ये प्रचंड जिद्द, चिकाटी आणि कष्ट करण्याची तयारी असते. योग्य दिशादर्शन आणि प्रामाणिक प्रयत्नांच्या जोरावर ते कोणतेही सर्वोच्च पद गाठू शकतात, असे प्रतिपादन दधनेश्वर शिवालयाचे महंत हभप सुदामदेव महाराज शास्त्री यांनी केले.

शेवगाव तालुक्यातील शहरटाकळी गावची कन्या रोहिणी भाऊराव वाघ हिची बृहन्मुंबई महानगरपालिका येथे कार्यकारी सहाय्यक पदावर निवड झाल्याबद्दल हिंदवी स्वराज्य प्रतिष्ठान व समस्त ग्रामस्थांच्या वतीने हनुमान मंदिर सभागृहात भव्य नागरी सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून सुदामदेव महाराज शास्त्री बोलत होते.

यावेळी ते म्हणाले की, खडतर परिस्थितीतून मार्ग काढत जिद्द आणि परिश्रमाच्या बळावर यशस्वीतेचे शिखर गाठणाऱ्या भूमिपुत्रीचा गौरव करण्याचे भाग्य मला लाभले. रोहिणी वाघ हिने आपली मेहनत, बुद्धिमत्ता आणि सचोटी यांच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. तिचे यश हे ग्रामीण भागातील इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे.

कार्यक्रमास कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती ड. अनिल मडके, युवा नेते व ग्रामपंचायत सदस्य संभाजी राजे गवळी, राजेंद्र खंडागळे, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक अंकुशराव फुंदे, सामाजिक कार्यकर्ते आबासाहेब राऊत, हभप गणेश महाराज गवळी, गोविंद कावळे, ग्रामपंचायत सदस्य संदीप राऊत, पेन्शनधारक संघटनेचे रामकृष्ण गोरे, मेजर रमेश नरवडे, मेजर बाळासाहेब खराडे, शेषराव आपशेटे, वसंत कावळे, राजेंद्र डोळे, अजीत वाघ आदी मान्यवर उपस्थित होते.

# अटक टाळण्यासाठी पोलिसावर कुऱ्हाडीने वार; ५ जणांवर गुन्हा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**पाथर्डी :** तालुक्यातील आल्हनवाडी शिवारात आरोपीस अटक करण्यासाठी गेलेल्या पोलिसावर जीवघेणा हल्ला झाल्याची धक्कादायक घटना शनिवारी (दि.२१) सकाळी घडली. या प्रकरणामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. याबाबत महाराष्ट्र पोलीस दलाच्या स्थानिक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पोलीस कॉन्स्टेबल संजय मोतीराम जाधव हे एका गुन्ह्यातील आरोपी कृष्णा हौसराव कर्डिले यास अटक करण्यासाठी स्टाफसह आल्हनवाडी येथे गेले होते. यावेळी आरोपी कृष्णा कर्डिले व त्याच्या कुटुंबीयांनी पोलीस पथकाला विरोध करत शिवीगाळ, दमदाटी करत झटापट केली.

दरम्यान, कृष्णा हौसराव कर्डिले याने आज एकाचा तरी जीव घेतो अशी धमकी देत हातातील कुऱ्हाडीने पोलीस कॉन्स्टेबल जाधव यांच्या गळ्यावर वार करण्याचा प्रयत्न केला. मात्र, जाधव यांनी प्रसंगावधान राखत वार चुकविल्याने मोठी दुर्घटना टळली.

तक्रारीनुसार, आदिनाथ त्रिंबक गोल्हार याने आरोपीस मोटारसायकलची चावी देऊन घटनास्थळावरून पळून जाण्यास मदत केल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी कृष्णा हौसराव कर्डिले, हौसराव ज्ञानदेव कर्डिले, मनीषा हौसराव कर्डिले, समर्थ हौसराव कर्डिले व आदिनाथ त्रिंबक गोल्हार (सर्व रा. आल्हनवाडी, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या घटनेचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक निवृत्ती आगरकर करत असून आरोपींचा शोध सुरू आहे. घटनेनंतर परिसरात काही काळ तणाव निर्माण झाला होता.

# न्यू आर्ट्स महाविद्यालयात ज्येष्ठ नागरिक शिबिर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**एरंडगाव :** शेवगाव येथील न्यू आर्ट्स महाविद्यालय न्यू आर्ट्स महाविद्यालय येथे संत गाडगे बाबा यांच्या जयंतीनिमित्त सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे,बहिःशाल शिक्षण मंडळ सहाय्यता कक्ष आणि अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे न्यू आर्टस्, कॉमर्स ण्ड सायन्स महाविद्यालय, बहिःशाल शिक्षण मंडळ केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एक दिवसीय ज्येष्ठ नागरिक शिबिर संपन्न झाले. या शिबिरास प्रमुख अतिथी व उद्घाटक म्हणून शेवगाव तालुक्यातील सुप्रसिद्ध व्यापारी व ज्येष्ठ नागरिक फिरस्ता संघाचे अध्यक्ष राधेश्याम तिवारी हे उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. पुरुषोत्तम कुंदे यांनी अध्यक्षीय मनोगतात आजचे युवक आणि सभोवतालचा ज्येष्ठ समाज यांच्यातील सुसंवाद कालप्रवाहानुरुप दूरावत चालला आहे. या शिबिरास राधेश्याम तिवारी, माजी उपप्राचार्य परशुराम गणगे, स्नेहलता लबडे व शेवगाव तालुक्यातील, पंचक्रोशीतील शंभरहून अधिक ज्येष्ठ नागरिक आणि महाविद्यालयीन विद्यार्थी-सर्व शिक्षकेतर कर्मचारीवृंद, प्राध्यापकवृंद आणि पालक उपस्थित होते. ब.शि.मं.केंद्र कार्यवाह प्रो.डॉ. वसंत शेंडगे यांनी प्रास्ताविक केले. प्रा.बाळासाहेब कसबे व सार्थक कापसे यांनी सूत्रसंचालन केले व आभार कु.साक्षी गवळी यांनी मानले.



# रविशंकर विद्यामंदिरात संत गाडगेबाबा जयंती

## स्वच्छता अभियान राबवत साजरी; संस्थेचे कार्यवाहक गाडगेबाबांच्या वेशभूषेत





प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कर्जत :** सोमवार, दि २३ रोजी संत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त रविशंकर विद्यामंदिरात विद्यार्थ्यांसह शिक्षक आणि संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी हाती खराटा घेत स्वच्छता मोहीम राबवली. विशेष म्हणजे परिपाठातील प्रार्थना चालू असताना संस्थेचे प्रमुख कार्यवाहक यांनी संत गाडगेबाबा यांची वेशभूषा धारण करीत सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला. शाळेतील शिक्षकांनी देखील त्यांना ओळखले नाही.

वेळ सकाळची ९:४५ वाजता रविशंकर विद्यामंदिरात सर्वच विद्यार्थी शालेय कामकाजानुसार परिपाठ आणि प्रार्थना चालू असताना चेहऱ्यावर पांढरी दाढी, अंगावर भगवा लांब लचक सदरा त्यास ठिगळ, हातात अर्धा फुटलेला खापराचे गाडगे घेत प्रवेश करतात.

अचानक आलेल्या संत गाडगेबाबांच्या वेशभूषाधारक पाहुण्यांने शिक्षकांसह विद्यार्थी देखील गोंधळात पडले.शिक्षक देखील अचानक आलेले पाहुणे संस्थेचे प्रमुख असल्याचे तेव्हा कळाले. यावेळी त्यांच्या हस्तेच मग संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. एवढ्यावरच शाळेच्या जयंतीचा कार्यक्रम न थांबता नंदकुमार लांगोरे यांनी आपल्या वाहनात आणलेले खराटे स्वता हाती घेत विद्यार्थ्यांसह शिक्षकांच्या सोबत स्वच्छता मोहीम राबवत गाडगेबाबांचा संदेश प्रत्यक्ष विद्यार्थ्यांत रुजवला. या आगळ्या-वेगळ्या संत गाडगेबाबांची जयंती पालकांनी देखील कौतुक करीत काही काळ स्वच्छता मोहिमेत आपले योगदान दिले.

**महापुरुषांची जयंती-पुण्यतिथी त्यांच्या विचारांवर साजरी करण्याचा मानस : नंदकुमार लांगोरे**

सर्वच महापुरुषांनी आपल्या कार्यकाळात समाज जनजागृतीचे कार्य पार पाडले आहेत. त्यांची जयंती अथवा पुण्यतिथीच्या दिवशीच त्यांची आठवण काढून साजरे करण्यावर आपला भर आहे. मात्र त्यांच्या कार्यावर आणि विचारांवर चालण्याचा कोणी वास्तविक प्रयत्न करीत नाही. विद्यार्थ्यांना त्यांचे विचार त्यांचे कार्य माहिती पडावे यासाठी आज शाळेत स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

दैनिक राष्ट्र सह्याद्री

मंगळवार, दि.२४ फेब्रुवारी २०२६ । अहिल्यानगर । पान नं. ८

धरणग्रस्तांच्या ५० वर्षांच्या प्रलंबित प्रश्नांवर...

## आज वरखेड येथे बैठक

**नेवासा :** तालुक्यातील धरणग्रस्तांच्या ५० वर्षांच्या प्रलंबित प्रश्नांवर अहिल्यानगर जिल्हयाचे अप्पर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवारी दि.२४ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ वाजता वरखेड येथे पांडुरंग मंदिरामध्ये विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती वरखेड महालक्ष्मी मंदिर संस्थानचे अध्यक्ष कडूबाळ गोरे पाटील यांनी दिली.धरणग्रस्तांच्या तब्बल पन्नास वर्षांपासून प्रलंबित असलेल्या प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी ही महत्वपूर्ण बैठक धरणग्रस्तांच्या न्यायहक्कासाठी होणार असून या बैठकीला पंचक्रोशीतील धरणग्रस्त बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन कडुबाळ गोरे पाटील,मच्छिंद्र आरले,संदीप बेळगे यांनी केले आहे

सिंचन समृद्धीसाठी महत्त्वपूर्ण निर्णय

# जलसंपदा विभागाचा कार्यअहवाल प्रकाशित



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**झरेकाठी :** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील भाजपा-महायुती सरकारमध्ये जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांनी १ जानेवारी २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत गोदावरी व कृष्णा पाटबंधारे विकास महामंडळांच्या लाभक्षेत्रातील सिंचन समृद्धीसाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतल्याची माहिती देण्यात आली.

यापूर्वी जलसंपदा विभागाची जबाबदारी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे होती. त्यांच्या कार्यकाळातील निर्णय विभागासाठी दिशादर्शक ठरल्याचे नमूद करण्यात आले. या कालावधीत राबविण्यात आलेल्या विविध योजनांचा व निर्णयांचा सविस्तर आढावा असलेला कार्यअहवाल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार तसेच इतर मंत्र्यांच्या उपस्थितीत प्रकाशित करण्यात आला.

यावेळी बोलताना, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या महत्त्वाकांक्षी नदीजोड प्रकल्पाला महायुती सरकारने गती दिली असून, दुष्काळमुक्त महाराष्ट्राचा संकल्प या निर्णयांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे साध्य होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

राज्यात शाश्वत सिंचन विकास साध्य करण्यासाठी जलसंपदा विभाग कटिबद्ध असून, कृषी व औद्योगिक प्रगती, पर्यावरणीय संतुलन आणि नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी पुढील काळातही ठोस पावले उचलली जातील, असा निर्धार कार्यअहवालातून व्यक्त करण्यात आला.

# स्मार्ट मीटर 'एक क्लिक' आणि अंधार

थकबाकीदारांवर महावितरणची डिजिटल कारवाई

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**सोनगाव :** महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित (महावितरण) यांनी सोनगाव व परिसरात स्मार्ट मीटरच्या माध्यमातून थकबाकीदार ग्राहकांवर डिजिटल कारवाईचा बडगा उगारला आहे. मुंबई येथील नियंत्रण कक्षातून रिमोट प्रणालीद्वारे वीजजोडण्या खंडित करण्यात आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली.

दीर्घकाळ वीजबिले थकीत असलेल्या ग्राहकांना वारंवार सूचना देऊनही प्रतिसाद न मिळाल्याने अखेर 'एक क्लिक'वर जोडण्या तोडण्यात आल्या. सूत्रांच्या माहितीनुसार काही ग्राहकांची थकबाकी लाखोंमध्ये आहे. नियम सर्वांसाठी समान, असा ठाम संदेश देत महावितरणने डिजिटल युगातील कठोर कारवाईची झलक दाखवली आहे. मात्र अचानक झालेल्या या कारवाईमुळे अनेक कुटुंबे अंधारात गेली. सध्या परीक्षाकाळ सुरू असल्याने विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर परिणाम झाल्याची तक्रार पालकांनी केली. ग्रामीण भागात ऑनलाईन व्यवहारातील अडचणी व नेटवर्क समस्यांचा विचार करून कारवाईत मानवी दृष्टीकोन ठेवावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. महावितरणकडून स्पष्ट करण्यात आले की, थकीत रक्कम तत्काळ भरल्यास वीजपुरवठा पूर्ववत करण्यात येईल. भविष्यातही स्मार्ट मीटर व रिमोट तंत्रज्ञानाच्या सहाय्याने थकबाकीदारांविरुद्ध कठोर पावले उचलली जाणार असल्याचा इशाराही देण्यात आला आहे. दरम्यान, काही ग्राहकांनी अद्याप स्मार्ट मीटर बसविले नसल्याने त्यांचे बिल जुन्या पद्धतीनेच राहणार का, वसुली कशी होणार, असा सवाल उपस्थित केला आहे. तसेच महावितरण कर्मचाऱ्यांकडून मेसेज व स्टेट्सद्वारे वीजबिले वेळेत भरण्याचे आवाहन करण्यात येत असून, मुंबई नियंत्रण कक्षातून रिमोट प्रणालीद्वारे जोडण्या खंडित केल्या जात असल्याची माहिती ग्राहकांना दिली जात आहे.

डिजिटल कारवाईचा हा धडाका पुढे किती व्यापक होणार, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

सेवा संस्थेचे पीक कर्ज थकविल्याने अध्यक्ष

# अप्पासाहेब बाचकर यांचे संचालक पद रद्द

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**राहुरी :** तालुक्यातील वावरथ येथील सेवा संस्थेचे विद्यमान अध्यक्ष अप्पासाहेब दादा बाचकर यांचे संचालक पद संस्थेचे कर्ज थकविल्या प्रकरणी रद्द करण्यात आले आहे. याबाबतचा आदेश राहुरीचे सहाय्यक निबंधक (सहकार) रावसाहेब खेडकर यांनी दिला आहे. यासंदर्भातील सविस्तर माहिती अशी की, संस्थेचे अध्यक्ष अप्पासाहेब बाचकर यांनी आडसाली ऊस पिकासाठी संस्थेकडून पीक कर्ज घेतले होते. संबंधित कर्जाची परतफेड ३० जूनपर्यंत करणे बंधनकारक असताना सुद्धा त्यांनी निर्धारित मुदतीत कर्जफेड केली नव्हती. त्यामुळे कर्ज थकबाकीत राहिले होते.

या संदर्भात संस्थेचे सभासद संजय कृष्णा बाचकर व अविनाश बाचकर यांनी सहाय्यक निबंधक (सहकार), राहुरी यांच्याकडे तक्रार दाखल केली होती. थकीत कर्जदार व्यक्तीला सहकारी संस्थेच्या संचालक मंडळावर राहण्याचा अधिकार नसल्याचा मुद्दा तक्रारीत उपस्थित करण्यात आला होता. तक्रारीची दखल घेत सहाय्यक निबंधक कार्यालयाने सुनावणी घेतली. यावेळी संस्थेच्या सचिवांचा अहवाल तसेच कर्जफेडीबाबतची कागदपत्रे तपासण्यात आली. त्यानुसार संबंधित कर्जाची रक्कम नियोजित तारखेनंतर म्हणजेच १८ सप्टेंबर २०२५ रोजी भरल्याचे आढळून आले. नियमानुसार मुदतीत कर्जफेड न केल्यामुळे अप्पासाहेब बाचकर यांचे संचालक पद रद्द करण्याचा आदेश देण्यात आला.

दरम्यान, काही महिन्यांपूर्वीच त्यांची अध्यक्षपदी निवड झाली होती. मात्र निवडीनंतर अल्पावधीतच पद रद्द झाल्याने सहकार क्षेत्रात खळबळ उडाली आहे. या निर्णयामुळे सहकारी संस्थांमधील आर्थिक व्यवहार अधिक पारदर्शक ठेवणे हे अधोरेखित झाले असून, सत्तेचा गैरवापर सहन केला जाणार नाही, असा स्पष्ट संदेश सहकार खात्याने या कारवाईतून दिला आहे.

# जोगेश्वरी नगरपरिषदेच्या शाळेत भिंतीवर बिबट्याचे दर्शन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**राहुरी :** शहर हद्दीतील जोगेश्वरी आखाडा परिसरात नगर परिषदेच्या शाळेच्या प्रांगणात शिवजयंतीचा कार्यक्रम सुरू असताना अचानक बिबट्याचे दर्शन झाल्याने एकच खळबळ उडाली. गर्दीच्या ठिकाणी बिबट्या आल्याची माहिती समोर आल्यानंतर नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

१९ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्रीच्या वेळी शिवजयंती कार्यक्रम सुरू असतानाच बिबट्या शाळेच्या संरक्षक भिंतीवर बसलेला दिसून आला. कार्यक्रम संपल्या नंतर काही नागरिक चारचाकी वाहनातून घरी जात असताना त्यांना भिंतीवर बसलेला बिबट्या स्पष्टपणे दिसला. याच परिसरात शिवजयंती निमित्त महिलांचा सांस्कृतिक कार्यक्रम रात्री उशिरापर्यंत सुरू होता. कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने महिला, नागरिक तसेच लहान मुले उपस्थित होती. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र संभाव्य अनर्थ टळल्याने मोठी दुर्घटना टळल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली. शाळा परिसर व लगतचा निवासी भाग या ठिकाणी बिबट्याचा वावर असल्याने पालक वर्गात तीव्र चिंतेचे वातावरण आहे. लहान मुलांची सुरक्षितता आणि नागरिकांच्या जीविताचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

नगरसेवक डौले प्रशांत विजय यांनी प्रशासनाने तातडीने दखल घेऊन परिसरात वनविभागाची गस्त वाढवावी, पिंजरा लावून बिबट्याचा बंदोबस्त करावा. तसेच नागरिकांच्या सुरक्षेसाठी ठोस उपाय योजना कराव्यात, अशी मागणी केली आहे. या संदर्भात प्रशासनाला निवेदन देण्यात येणार असून सर्व ग्रामस्थांनी सह्या करून पाठिंबा द्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. परिसरात सीसीटीव्ही यंत्रणा बसविणे, रात्रीच्या वेळी पोलीस व वन विभागाची संयुक्त गस्त वाढविणे आणि नागरिकांना सतर्कतेचे आवाहन करणे, या उपाय योजना तातडीने राबविण्याची गरज व्यक्त होत आहे

दरम्यान वन विभागाने या घटनेकडे गांभीर्याने पाहून त्वरित कारवाई करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही स्थानिकांकडून देण्यात आला आहे. आता प्रशासन किती तत्परता दाखवते, याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## 'आमची टीप पोलिसांना देतो का?' म्हणत तरुणावर हल्ला; चौघांवर गुन्हा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** तू आमची टीप पोलिसांना देतो का? असे म्हणत एका तरुणावर दगड व लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना राहुरी तालुक्यातील कानडगाव येथे २१ फेब्रुवारी रोजी दुपारी घडली. या प्रकरणी चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महेश रामनाथ लोंढे (वय २५, रा. कानडगाव) हा आपल्या मित्रासह घरी जात असताना कानडगाव येथील अहिल्यादेवी होळकर चौक येथे आरोपींनी त्यांना अडवले. फिर्यादीनुसार, आरोपी राजमोहम्मद बशीर सय्यद याने तू आमच्या टिपा पोलिसांना देतो का? असे म्हणत महेश लोंढे यास दगड व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यानंतर इतर आरोपींनाही घटनास्थळी बोलावून घेण्यात आले.

आरोपींनी महेश लोंढे यांच्या गळ्यावर चाकू लावून धमकावल्याचेही फिर्यादीत नमूद आहे. त्यावेळी मित्र सुरज अशोक घोडके याने चाकू हिसकावण्याचा प्रयत्न करत असताना तो चाकू महेश यांच्या मनगटाजवळ लागला. त्यानंतर दोघांनाही शिवीगाळ करत मारहाण करण्यात आली तसेच जीवे मारण्याची धमकी देण्यात आली.

या प्रकरणी राजमोहम्मद बशीर सय्यद, साहिल शकिल सय्यद, शकिल इस्माईल सय्यद व शाहिन शकिल सय्यद (सर्व रा. कानडगाव, ता. राहुरी) यांच्याविरुद्ध गुन्हा रजिस्टर क्रमांक १७१/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ११५ (२), ११८ (१), ३५१ (२), ३५२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे करीत आहेत.

## गोवंशीय जनावरे घेऊन जाणारा टेम्पो पाठलाग करून पकडला

**श्रीरामपूर :** राहुरी येथुन कत्तलीसाठी श्रीरामपूरच्या दिशेने गोवंशी जातीचे जनावरे भरुन येत असलेल्या पिकअप वाहनास पोलिसांनी शहरातील भगतसिंग चौक येथे हटकले असता पाठलाग करत टेम्पोला काझीबाबा रोडवर वाई.नं.२ येथे पकडले. पोलिसांनी त्याच्याकडून ७ लाख २० हजार रुपयांचा ऐवज हस्तगत केला.

राहुरी येथुन कत्तलीसाठी जाणारे गोवंशी जातीचे जनावरे भरुन जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी शहरातील भगतसिंग चौक येथे हटकले असता टेम्पो चालकाने वाहन जोरात चालवून नेला पोलिसांनी या टेम्पोचा पाठलाग करत टेम्पोला काझीबाबा रोडवर वाई. नं.२ येथे पकडले. त्यात खात्री केली असता राहुरी तालुक्यातील रा.टाकळीमियॉ येथील चांद उमर पठाण हा त्याच्या क्र.एम एच १६ ए.वाय २००७ यातून १ लाख २० हजार रुपयांचे तीन गोवंशीय गायी श्रीरामपूरकडे घेऊन येत होता. पोलिसानी चांद पठाण याचेकडून ७ लाख २० हजाराचा ऐवज हस्तगत केला. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात पोलीस कॉन्स्टेबल अजित अशोक पटारे यांनी फिर्याद दाखल केली असून पोलिसांनी चांद उमर पठाण याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## फायनान्सचे सील तोडून कर्जदाराने प्रॉपर्टी घेतली ताब्यात, गुन्हा दाखल

**श्रीरामपूर :** फायनान्स कंपनीकडून १ कोटीहून अधिक रक्कमचे कर्ज घेवून कर्ज वेळेवर न फेडल्याने फायनान्स कंपनीने सील केलेली प्रॉपर्टी कर्जदाराने सील तोडून मालमत्ता ताब्यात घेतली. याप्रकरणी फायनान्स कंपनीने गुन्हा दाखल केला आहे.

चोलामंडलम् इन्व्हेसमेंट अँड फायनान्स या कंपनीने श्रीरामपुरातील रमेश मोतीलाल सोनवणे, (रा. मारूती मंदिररोड, वॉर्ड नं. ३, श्रीरामपूर) यांना १ कोटी ५० हजार व त्यानंतर २० लाख ५ हजार एवढे कर्ज दिले होते. त्याबदल्यात सोनवणे यांच्या मालकीचे शहरातील आदित्य अपार्टमेंटमधील पहिल्या मजल्यावरील फ्लॅट तसेच कुंभारगल्ली, वॉर्ड नं. ३ मधील दत्तकृपा निवास नावाचा बंगला कंपनीने तारण म्हणून घेतला होता. सोनवणे यांनी २०२२ पर्यंत नियमित हप्ते भरले मात्र त्यानंतर त्यांनी नियमाप्रमाणे हप्ता न भरल्याने त्यांच्या प्रॉपर्टीचा ताबा मिळण्यासाठी कपंनीने कोर्टात दावा दाखल केला होता. त्यानंतर कोर्टाने सदर मालमत्ता आमच्या ताब्यात देण्यास मंजूरी दिली. त्यानुसार कंपनीने दोन्ही प्रॉपर्टीचा पंचनामा करून त्यावर कंपनीचे सील लावून सुरक्षा रक्षक नेमले होते. परंतू, कर्जदार रमेश सोनवणे यांनी व त्यांच्या दोन्ही मुले व इतर पाच-सहा जणांनी चोलामंडलम् कंपनीचे सील तोडून बळजबरीने कंपनीच्या ताब्यातील मालमत्तेचे कुलूप तोडून त्यात प्रवेश करून ती ताब्यात घेवून अतिक्रमण केले केले.

याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात चोलामंडलम् इन्व्हेसमेंट अँड फायनान्स कंपनीचे वित्तीय सहाय्यक स्वप्नील पवार यांनी फिर्याद दाखल केली असून पोलिसांनी रमेश मोतीलाल सोनवणे यांच्यासह दोन्ही मुले व इतर पाच-सात जणांविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

# हॉर्नच्या भरोशावर नगरमध्ये कचरा संकलन!

नागरिकांचा उद्रेक : ठेकेदारावर तातडीने कारवाईची मागणी

**नागरिकांच्या प्रमुख तक्रारी**

* केवळ हॉर्नवर सूचना; ध्वनीफीत बंद
* ठरावीक वेळापत्रकाचा अभाव
* दोन ते तीन दिवस कचरा गाडी न येण्याचे प्रकार
* रस्त्यावर कचरा, दुर्गंधी व अस्वच्छता
* ठेकेदाराच्या मनमानी कारभारावर रोष

विशेष प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शहर स्वच्छतेचा कणा असलेल्या 'घर ते घर कचरा संकलन' योजनेचा बोजवारा उडाल्याचे चित्र सध्या अहिल्यानगरमध्ये दिसून येत आहे. ध्वनीफीत किंवा उद्घोषणेद्वारे स्पष्ट सूचना देण्याऐवजी केवळ हॉर्न वाजवून कचरा संकलन केले जात असल्याने शहरभर गोंधळाची स्थिती निर्माण झाली आहे. परिणामी नागरिकांना वेळेत कचरा गाडी आल्याचे समजत नसून रस्त्यावर कचरा टाकण्याचे प्रमाण वाढले आहे.

महापालिकेने खासगी ठेकेदारामार्फत राबविलेल्या घर ते घर कचरा संकलन योजनेत सुरुवातीला नियमित वेळापत्रक, ठरावीक मार्ग आणि ध्वनीप्रणालीद्वारे सूचना देण्याची हमी देण्यात आली होती. मात्र प्रत्यक्षात ही सर्व व्यवस्था केवळ कागदावरच मर्यादित राहिल्याचे स्पष्ट झाले आहे. अनेक भागांत कचरा गाडी येताना कोणतीही ध्वनीफीत न वाजवता केवळ दोन-चार वेळा हॉर्न वाजवून पुढे निघून जाण्याचे प्रकार सर्रास घडत आहेत. त्यामुळे नागरिकांना गाडी कुठे आहे, ती नेमकी कुठल्या गल्लीत थांबली आहे, याचा अंदाज येत नाही. काही क्षणांचा हॉर्न ऐकून घराबाहेर धाव घेणे अशक्य असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.




विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला, लहान मुले तसेच आजारी व्यक्तींना या व्यवस्थेचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अनेक वेळा नागरिक कचरा घेऊन बाहेर येईपर्यंत गाडी निघून गेलेली असते. परिणामी 'काय करायचे?' हा प्रश्न उभा राहतो. दुसऱ्या दिवशी गाडी येईल, या अपेक्षेने काहीजण कचरा घराबाहेर ठेवतात. मात्र तोपर्यंत भटकी जनावरे, कुत्रे व पक्षी पिशव्या फाडून कचरा रस्त्यावर विखुरतात. त्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरते, डास व माशांचा प्रादुर्भाव वाढतो आणि आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण होतो.

काही भागांत तर दोन ते तीन दिवस कचरा संकलनाची गाडीच येत नसल्याच्या तक्रारी सातत्याने पुढे येत आहेत. निश्चित वेळापत्रक नसल्यामुळे नागरिकांना सकाळपासून प्रतीक्षा करावी लागते. गाडी कधी येईल, याचा नेम नसल्याने अनेकांचा दिनक्रम विस्कळीत होत आहे. स्वच्छतेसाठी सहकार्य करणारे नागरिकही हतबल झाले आहेत. वेळेत कचरा देण्याची तयारी असते, पण गाडीच अनिश्चित असेल तर काय करायचे? असा सवाल संतप्त नागरिक विचारत आहेत.

पूर्वी कचरा गाड्यांवरून स्वच्छतेबाबत संदेश देणारी व कचरा संकलनाची स्पष्ट सूचना देणारी ध्वनीफीत वाजवली जात होती. त्यामुळे नागरिकांना गाडी येत असल्याची अचूक कल्पना मिळत असे. मात्र ही व्यवस्था अचानक बंद का करण्यात आली, याबाबत कोणताही खुलासा करण्यात आलेला नाही. शहरात आधीच वाहतुकीचा, हॉर्नचा व बांधकामांचा प्रचंड आवाज असताना केवळ हॉर्नवर आधारित सूचना देणे म्हणजे नागरिकांची थट्टा असल्याची टीका जोर धरत आहे.

महापालिकेने कचरा संकलनाची जबाबदारी खासगी ठेकेदाराकडे सोपविली आहे. मात्र करारातील अटी व शर्तींचे उल्लंघन होत असल्याचा गंभीर आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. नियमित फेऱ्या, ठरावीक वेळ, ध्वनीप्रणालीद्वारे सूचना, स्वच्छ वाहने व प्रशिक्षित कर्मचारी या सर्व बाबी कागदावरच असल्याचे चित्र आहे. प्रशासनाच्या ढिसाळ नियंत्रणामुळे ठेकेदार मनमानी कारभार करत असल्याचा आरोप होत आहे. कराराचे उल्लंघन करणाऱ्या संबंधित ठेकेदारावर दंडात्मक कारवाई करून त्याला जाब विचारावा, अशी एकमुखी मागणी पुढे येत आहे.

या प्रश्नावर सामाजिक कार्यकर्ते, पर्यावरणप्रेमी व स्वच्छता अभियानाशी संबंधित संस्थांनीही तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. स्वच्छ शहर घडविण्यासाठी नागरिकांचे सहकार्य अत्यावश्यक आहे. मात्र प्रशासन व ठेकेदारांनी आपली जबाबदारी पार पाडली नाही, तर नागरिकांचा उत्साह मावळेल. कचरा गाडीची स्पष्ट व वेळेत सूचना मिळाली, तर रस्त्यावर कचरा टाकण्याचे प्रकार आपोआप कमी होतील, असे मत सामाजिक कार्यकर्त्यांनी व्यक्त केले.

दरम्यान, वाढत्या तक्रारींची दखल घेत महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी संबंधित ठेकेदाराला सूचना देण्याचे आश्वासन दिले आहे. कचरा संकलन प्रक्रिया अधिक शिस्तबद्ध, नियमित व वेळेवर राबविण्यासाठी तसेच ध्वनीप्रणाली पुन्हा सुरू करण्यासाठी उपाययोजना केल्या जातील, असे सांगण्यात आले आहे. मात्र केवळ आश्वासनांवर न थांबता प्रत्यक्षात ठोस कारवाई झाली पाहिजे, अशी ठाम भूमिका नागरिकांनी घेतली आहे. शहर स्वच्छ ठेवायचे असेल, तर प्रशासनाने झोपेतून जागे होऊन कठोर निर्णय घ्यावेत, अन्यथा नागरिक रस्त्यावर उतरण्याचा इशाराही देण्यात येत आहे.